RNI NO. MAHMAR/2020/84035





BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ


**दि. २० एप्रिल 2026**



1938- सातारा येथील सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.
1942- चौपाटीवर डॉ. एम.आर.जयकर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. आंबेडरांची सुवर्ण जयंती (51 वाह वाढदिवस)
1954- भंडारा येथे निवडणूक प्रचारासाठी नागपूरला आगमन.

संकलन प्रा. यशवंत दुपटे


सोमवार, २० एप्रिल २०२६ | वर्ष : ६ | अंक : ११० | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Monday, 20 April 2026 | Year : 6 | Issue : 110 | Daily | Rate: Rs. 5/-


18 जणांचा मृत्यू

# तामिळनाडू येथील फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट





**चेन्नई :** तामिळनाडूच्या विरुधुनगर जिल्ह्याजवळील कट्टनारपट्टी येथील वनजा फटाका कारखान्यात रविवारी स्फोट झाल्याने एक मोठा अपघात घडला. या अपघातात 18 जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एका पोस्टमध्ये लिहिले आहे की, विरुधुनगर जिल्ह्यातील फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात अनेक लोकांच्या मृत्यूच्या दुःखद बातमीने मला तीव्र दुःख झाले आहे. मृतांच्या कुटुंबीयांप्रति माझ्या मनःपूर्वक संवेदना. मिळालेल्या माहितीनुसार, हा कारखाना गोविंदनल्लूर येथील रहिवासी मुथू मणिकम यांच्या मालकीचा असून तो वैध आरडीओ परवान्याअंतर्गत कार्यरत होता. कारखान्याच्या आवारात 30 हून अधिक खोल्या असून 50 हून अधिक कामगार कामावर आहेत. रविवारी, सुमारे 30 कामगार कामावर असताना अचानक एक मोठा स्फोट झाला. या स्फोटामुळे किमान चार खोल्यांचे मोठे नुकसान झाले आणि सर्वत्र घबराट पसरली.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन विभागाची टीम लगेच पोहोचली आणि जवळ जवळ एका तासापासून अधिक वेळ आगीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला. या स्फोटाच्या वेळी फैक्ट्री मध्ये 30 पेक्षा जास्त मजदूरा होते. आतापर्यंत अंदाजे 18 मृतदेह सापडले असून, इतर बेपत्ता लोकांचा शोध सुरू आहे. या दुःखद घटनेनंतर प्रशासन आणि पोलीस विभागानेही कारवाईला सुरुवात केली आहे. पोलीस अधीक्षक (एसपी) श्रीनाथ यांनी स्वतः घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतला असून, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. मदत आणि बचाव कार्य कसे सुरू आहे? अग्निशमन आणि बचाव विभागाच्या माहितीनुसार, आतापर्यंत अनेक मृतदेह सापडले असून, उर्वरित पीडितांचा शोध सुरू आहे. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. प्रशासनाने संपूर्ण परिसर सील केला असून स्फोटाच्या कारणाची चौकशी सुरू केली आहे. प्राथमिक संशयानुसार, कारखान्यात साठवलेल्या ज्वलनशील पदार्थांमुळे हा स्फोट झाला असावा, मात्र खरे कारण चौकशी पूर्ण झाल्यावरच कळेल. या अपघातामुळे फटाक्यांच्या कारखान्यांमधील सुरक्षा मानकांवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी दुःख व्यक्त केले. या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले.



करतांना राज्याचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन म्हणाले की, ही घटना अत्यंत दुःखद असून त्यांना मोठा धक्का बसला आहे. त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांप्रति शोक व्यक्त केला आणि या कठीण काळात सरकार त्यांच्या पाठीशी उभे असल्याचे सांगितले. त्यांनी प्रशासनाला मदत आणि साहाय्य कार्याला गती देण्याचे निर्देशही दिले. ते म्हणाले, 'मी मंत्री के.के.एस.एस.आर. रामचन्द्रन आणि थंगम थेन्नारासू यांना तातडीने घटनास्थळी पोहोचून बचाव कार्याला गती देण्याची, त्यावर देखरेख ठेवण्याची आणि पीडित कुटुंबांचे सांत्वन करण्याची विनंती केली आहे. या घटनेची माहिती मिळताच मी जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधला आणि त्यांना सर्व आवश्यक मदतीचे समन्वय साधण्याचे निर्देश दिले. राष्ट्रपती आणि प्रधानमंत्री मोदी यांनीही शोक व्यक्त केला.

# मराठी न शिकवणाऱ्या 18 हजार शाळा शिक्षण विभागाच्या 'रडार'वर

**पुणे :** 'राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळा मराठी भाषा विषय शिकवतात की नाही, याची तपासणी लगेचच सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी गटशिक्षणाधिकारी स्तरापासूनच्या अधिकाऱ्यांचे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध आहे,' अशी माहिती राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी दिली. राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यासाठी राज्य सरकारने 2020मध्ये अधिनियम केला. त्यानंतर 1 जून 2020 रोजीच्या शासननिर्णयानुसार शैक्षणिक वर्ष 2020-21 पासून राज्यातील सर्व शाळांमध्ये पहिली ते दहावीपर्यंत टप्प्याटप्प्याने मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याचा आदेश देण्यात आला.

'राज्य शासनाच्या कायद्यानुसार शाळांनी पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मराठी शिकवणे बंधनकारक आहे. त्यामुळे शाळा अध्यापन करतात की नाही, याची पडताळणी शिक्षण विभागामार्फत शाळांमध्ये जाऊन करण्यात येणार आहे. त्यासाठी तपासणी पथकांची नेमणूक करण्यात येईल. राज्यभरात सुमारे 18 हजार खासगी शाळा आहेत. या शाळांची तपासणी, पडताळणी करण्यासाठी शिक्षण विभागाकडे क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध आहे. येत्या काळात केंद्रप्रमुख परीक्षेतून पात्र ठरलेल्या शिक्षकांना केंद्रप्रमुखपदी नियुक्ती दिली जाणार आहे. त्यामुळे राज्यभरात नियुक्त होणारे केंद्रप्रमुखही तपासणीसाठी उपलब्ध होऊ शकतील,' असे सिंह यांनी सांगितले. राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या बहुतांश खासगी शाळा किंवा अन्य मंडळांशी संलग्न शाळा मराठी विषय शिकवतात. अनेक शाळांनी मराठी भाषा शिकवण्यासाठी स्वतंत्र शिक्षकांचीही नियुक्ती केली आहे.



**अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या शाळांना एक लाख रुपयांपर्यंतचा दंड, शाळेची मान्यता किंवा ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याची तरतूद करण्यात आली. मात्र, खासगी संस्थांच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नसल्याची बाब निदर्शनास आल्याने संबंधित शाळांची मान्यता, ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यासाठीची कार्यपद्धती शालेय शिक्षण विभागाने निश्चित केली. त्यानुसार, मराठी न शिकवणाऱ्या शाळांची मान्यता, ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याचे अधिकार शिक्षण आयुक्तांना देण्यात आले आहेत. शिवाय, मराठी भाषा विषय पात्रताधारक शिक्षक नियुक्त करण्याचा आदेशही शाळांना देण्यात आला आहे.**

काही शाळांमध्ये नववी, दहावीच्या स्तरावर मराठी भाषा विषय सोडून अन्य भाषांचा पर्याय घेता येतो. मात्र, कायद्यानुसार दहावीपर्यंत मराठी शिकवणे बंधनकारक असल्याने शाळांनी त्याचे पालन करणे आवश्यक आहे. - जागृती धर्माधिकारी, अध्यक्ष, इंडिपेंडंट इंग्लिश स्कूल्स असोसिएशन (इसा).

## महत्त्वाच्या बातम्या

### आरएसएसला दिलेल्या 'झेड प्लस' सुरक्षेचा खर्च सरसंघचालकाकडूनच वसूल करा : याचिका दाखल

**नागपूर :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस ) आणि सरसंघचालक मोहन भागवत यांना पुरवण्यात येणाऱ्या झेड प्लस व्हीव्हीआयपी सुरक्षेचा खर्च करदात्यांच्या पैशातून केला जात आहे. यामुळे सरकारी तिजोरीवर भार पडत असून हा खर्च सरसंघचालक यांच्या कडूनच वसूल करण्यात यावा, अशा आशयाची जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आली आहे. नागपूरचे सामाजिक कार्यकर्ते ललन किशोर सिंग यांनी ही याचिका दाखल केली. केंद्र सरकारचे गृहमंत्रालय, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (सीआयएसएफ), राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) आणि राज्य शासनाच्या वित्त विभागाला प्रतिवादी करण्यात आले आहे. याचिकेवर सोमवार, 20 एप्रिल रोजी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी होणार आहे.

### होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये पुन्हा तणाव

**नवी दिल्ली :** होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये तणाव पुन्हा एकदा शिगेला पोहोचला आहे. इराणने केलेल्या कथित गोळीबारानंतर भारतीय जहाजांना माघारी फिरावे लागले. हा महत्त्वाचा सागरी मार्ग तात्पुरता पुन्हा खुला केल्यानंतर काही दिवसांतच ही घटना घडली आहे. या संपूर्ण घडामोडीमुळे जागतिक तेल पुरवठा, सागरी सुरक्षा आणि प्रादेशिक स्थिरतेबद्दल गंभीर चिंता निर्माण झाली आहे. मिळालेल्या वृत्तानुसार, या घटनेत जग अर्णव आणि सन्मार हेराल्ड ही दोन भारतीय जहाजे सामील होती. यापैकी, सुमारे वीस लाख बॅरल इराकी कच्चे तेल घेऊन जाणाऱ्या जग अर्णववर गोळीबार करण्यात आला. दुसरे जहाज जवळच होते, परंतु त्याला लक्ष्य करण्यात आले नाही. या घटनेनंतर, दोन्ही जहाजांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून परतण्याचा निर्णय घेतला. इराणच्या रिव्होल्युशनरी गार्डशी संलग्न असलेल्या दोन गनबोट्सनी ओमानच्या ईशान्येला एका टँकरवर गोळीबार केला. मिळालेल्या माहितीनुसार, आणखी एका कंटेनर जहाजालाही एका अज्ञात क्षेपणास्त्राचा फटका बसला.

# खेरनगर शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ?

## विद्यार्थ्यांनामिळतेय निकृष्ट खिचडी

**मुंबई :** महापालिकेकडून माध्यान्ह भोजन योजना उत्तमपणे चालवली जाते, असे प्रशासनाचे म्हणणे आहे. मात्र, वांद्रे - खेरनगर पालिका इंग्रजी शाळा क्र. 2 मध्ये मात्र काही महिन्यांपासून निकृष्ट खिचडी येत असल्याने विद्यार्थी ही खिचडी न खाता बाथरूममध्ये फेकून देत असल्याचे चित्र समोर आले आहे.



केंद्राच्या माध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत महापालिका अडीच लाख विद्यार्थ्यांना नियमित आहार देते; मात्र खेरनगर शाळा क्र.2 मध्ये खिचडी निकृष्ट असल्याची काही विद्यार्थी पालकांची तक्रार आहे. त्याबाबत व्हिडीओ व्हायरल झाला आहे. तसेच परिसरातील 9 पालिका शाळांना माध्यान्ह आहार देणाऱ्या प्रशांती महिला बचत गटप्रमुखांनी खिचडी दर्जेदार असून एखाद्यावेळी त्रुटी झाली असू शकते असेही सांगितले. तर शाळेत 600-700 विद्यार्थ्यांपैकी 60 टक्के विद्यार्थी खिचडी खात नसल्याचे शिक्षकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले. जर काही ठिकाणी खराब खिचडी येत असेल तर याची चौकशी करून नियमानुसार कडक कारवाई केली जाईल. पालिका सदैव विद्यार्थी हिताला प्राधान्य देते, असे महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी कीर्तिवर्धन किरतकुडवे यांनी म्हटले आहे. तर, वरळी नगरसेविका पद्मजा चेंबुरकर म्हणाल्या की, 'अत्यंत निकृष्ट दर्जाची खिचडी वितरित केली जात आहे. मुलांना ती खाण्यास अयोग्य असल्याने ते उपाशी राहतात, ही अत्यंत गंभीर बाब आहे. यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांची तत्काळ चौकशी करून आवश्यक ती कारवाई करावी. विद्यार्थ्यांना अनेक महिन्यांपासून निकृष्ट दर्जाची खिचडी दिली जात असेल, तर हे बरोबर नाही. हा विद्यार्थ्यांवर अन्याय आहे. पालिकेने

# अनुसूचित जाती उपवर्गीकरण प्रक्रिया पारदर्शक नाही; अहवाल जाहीर करा : डॉ. नितीन राऊत

**नागपूर :** राज्यातील अनुसूचित जाती (SC) उपवर्गीकरण प्रक्रिया अपारदर्शक व नैसर्गिक न्यायतत्त्वाच्या विरोधात असल्याचा आरोप डॉ. नितीन राऊत यांनी केला आहे. याबाबत त्यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना पत्र पाठवून प्रक्रिया तात्काळ स्थगित करण्याची मागणी केली आहे.

न्या. अनंत बदर समितीचा अहवाल सार्वजनिक न करता केवळ पाच दिवसांत अभिप्राय मागवणे संशयास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. अहवालच उपलब्ध नसतांना जनतेने आक्षेप कसे नोंदवायचे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या काळात ही प्रक्रिया राबवून समाजाला मत मांडण्यापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न होत असल्याची टीकाही त्यांनी केली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार उपवर्गीकरणासाठी ठोस 'एम्पिरिकल डेटा' आवश्यक असताना शासनाने अद्याप कोणतीही जातनिहाय शैक्षणिक किंवा नोकरीविषयक आकडेवारी जाहीर केलेली नसल्याचे त्यांनी सांगितले. जर उपवर्गीकरण करायचेच असेल, तर ते केवळ नोकरीपुरते मर्यादित न ठेवता राजकीय क्षेत्र, उच्च शिक्षण (MBBS, IIT, IIM), परदेशी शिष्यवृत्ती व निमशासकीय संस्थांमध्येही लोकसंख्येच्या प्रमाणात लागू करावे, अशी मागणी त्यांनी केली. बदर समितीचा अहवाल अस्तित्वात असताना पुन्हा मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दुसरी समिती नेमल्याने शासनालाच मूळ निष्कर्षांवर शंका असल्याचे दिसते, असेही त्यांनी नमूद केले. डॉ. राऊत यांनी मांडलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये राज्याची जातनिहाय जनगणना, 'अ-ब-क-ड' वर्गीकरणाचा आधारभूत डेटा प्रसिद्ध करणे, सफाई कामगारांसाठी विशेष शैक्षणिक पॅकेज जाहीर करणे व समाजाला किमान 60 दिवसांची मुदत देणे यांचा समावेश आहे. 'राजकीय सोयीसाठी आरक्षणाचे तुकडे करून घाईघाईत निर्णय घेतल्यास अनुसूचित जातीतील ऐक्याला तडा जाईल,' असा इशाराही त्यांनी दिला.








# खर्गे यांनी तामिळनाडूमध्ये प्रधानमंत्री मोदींवर साधला निशाणा



**चेन्नई :** तामिळनाडू निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला आहे. कृष्णगिरी येथील एका जाहीर सभेत बोलतांना त्यांनी, 2023 मध्ये मंजूर झालेले महिला आरक्षण विधेयक अद्याप लागू का झाले नाही, असा प्रश्न उपस्थित केला. खर्गे यांनी पुढे सांगितले की, काँग्रेस महिला, लोकशाही आणि समानतेच्या पाठीशी उभी आहे, तसेच प्रधानमंत्री मोदींवर महिलाविरोधी भूमिका घेतल्याचा आरोप केला. या सभेत तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन हेदेखील उपस्थित होते. महिला आरक्षण विरोधी पक्षांच्या मते, लोकसभेतील 'कायदेशीर मानहानी'नंतर प्रधानमंत्रींनी केलेले भाषण, अशा भाषणांकडून अपेक्षित असलेली नेहमीची तटस्थता सोडून देणारे होते. जयराम रमेश म्हणाले की, हे प्रसारण म्हणजे विधेयकाला विरोध करणाऱ्या पक्षांना दोष देण्याच्या उद्देशाने केलेले 'काँग्रेसला शिवीगाळ करणारे भाषण' ठरले. त्यांनी असा युक्तिवाद केला की, या कथानकाद्वारे सरकारने स्वतः या कायद्याची हाताळणी कशी केली यावरून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न केला गेला.










बहुजन सौरभ

## संपादकीय

# अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण आणि जनगणना

### सामाजिक एकात्मतेसमोरील गंभीर प्रश्न

महाराष्ट्रात अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा मुद्दा सध्या अत्यंत संवेदनशील आणि व्यापक चर्चेचा विषय बनला आहे. सामाजिक न्याय, ऐतिहासिक संघर्ष आणि संविधानिक मूल्यांच्या पार्श्वभूमीवर या प्रश्नाकडे पाहणे आवश्यक आहे. उपवर्गीकरण हा केवळ तांत्रिक किंवा प्रशासकीय बदल नसून तो समाजाच्या एकात्मतेवर आणि भविष्यातील सामाजिक संतुलनावर परिणाम करणारा निर्णय ठरू शकतो.

जनगणना 2011 नुसार महाराष्ट्रातील 59 अनुसूचित जातींपैकी प्रमुख 12 अनुसूचित जातींची लोकसंख्या पुढीलप्रमाणे आहे

37 महार 80,06,060
46 मांग 24,88,531 (8 उपजातींची मिळून)
11 चांभार 14,11,072 (31 उपजातींची मिळून)
12 भंगी 2,17,166
18 ढोर – 1,16,287
26 होलार – 1,08,908
31 खाटीक – 1,08,491
34 लिंगडेर – 1,32,593
35 मादगी – 56,481
08 बसोर – 55,564
09 बेडाजंगम – 53,452
50 मेघवाल – 40,416
उर्वरित 47 जातींपैकी –
25 जातींची लोकसंख्या 50 ते 500 आहे,
4 जातींची लोकसंख्या 500 ते 1000 आहे,
6 जातींची लोकसंख्या 1000 ते 2000 आहे,
3 जातींची लोकसंख्या 2000 ते 5000 आहे,
4 जातींची लोकसंख्या 5,000 ते 10,000 आहे,
5 जातींची लोकसंख्या 10,000 ते 20,000 आहे.

वरील आकडेवारी स्पष्ट दाखवते की अनुसूचित जातींच्या संरचनेत मोठ्या आणि अत्यल्प लोकसंख्या असलेल्या जाती यांचे सहअस्तित्व आहे. गेल्या सत्तर वर्षांपासून एकत्रित आरक्षणाच्या चौकटीत या सर्व जातींना समान हक्काने संधी मिळाली आहे. शिक्षण, नोकरी आणि सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने या व्यवस्थेचा लाभ सर्व स्तरांपर्यंत पोहोचल्याचे दिसून येते.

उपवर्गीकरणाच्या प्रस्तावामागे काही जातींना अधिक लाभ मिळतो आणि काही मागे राहतात असा युक्तिवाद मांडला जातो. परंतु, हा मुद्दा पूर्णतः वस्तुस्थिती दर्शवित नाही. प्रत्यक्षात अनेकदा अनुसूचित जातींसाठी राखीव असलेल्या जागा पूर्णपणे भरल्या जात नाहीत. ही अंमलबजावणीतील त्रुटी दूर करण्याऐवजी उपवर्गीकरणाचा मार्ग स्वीकारणे म्हणजे मूळ समस्येकडे दुर्लक्ष करणे होय. इतिहासात पाहिले असता, विविध अस्पृश्य जातींना एकत्र आणून सामाजिक चळवळ उभी करण्याचे कार्य झाले. या ऐक्यामुळेच अनुसूचित जातींना घटनात्मक हक्क आणि आरक्षणाची हमी मिळाली. आज जर उपवर्गीकरणाच्या नावाखाली हे ऐक्य खंडित झाले, तर त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांमध्ये परस्पर स्पर्धा, मतभेद आणि तणाव वाढण्याची शक्यता आहे.

जनगणनेचा मुद्दा देखील या संदर्भात अत्यंत महत्वाचा ठरतो. धर्मांतरित बौद्ध समाजाने जनगणनेत अचूक नोंद करणे आवश्यक आहे. धर्म बौद्ध आणि जात महार लिहिली तरच अनुसूचित जाती म्हणून नोंद होऊ शकते ही वस्तुस्थिती आहे. याचा विचार केला पाहिजे. अनुसूचित जाती विभागण्याचा सरकारचा विचार आहे. त्यामध्ये प्रत्येक जात समूहाने आपली लोकसंख्या कमी होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. पूर्वीच्या जनगणनांमध्ये नोंदीतील तफावतीमुळे काही जातींच्या लोकसंख्येबाबत गैरसमज निर्माण झाले. प्रत्यक्षात कोणत्याही जातीची संख्या कमी झालेली नसताना आकडेवारी वेगळी दिसल्यामुळे धोरणात्मक निर्णयांवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली.

जर उपवर्गीकरण राबविले गेले, तर अत्यल्प लोकसंख्या असलेल्या जातींच्या वाट्याला काहीच येणार नाही, अशी भीती व्यक्त केली जाते. यामुळे भरल्या ताटात माती कालविणे अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. याउलट, एकत्रित आरक्षण व्यवस्था ही सर्व घटकांना सामावून घेणारी आणि संतुलित संधी देणारी ठरली आहे. संविधानाने दिलेली सामाजिक न्याय, समानता आणि बंधुता ही मूल्ये जपणे अत्यावश्यक आहे. उपवर्गीकरणामुळे समाजात कृत्रिम भेद निर्माण होऊन या मूल्यांना धक्का बसू शकतो. त्यामुळे कोणताही निर्णय घेताना दीर्घकालीन परिणामांचा सखोल विचार करणे गरजेचे आहे.

अखेर, अनुसूचित जातींच्या आरक्षणाचा प्रश्न हा केवळ वाटपाचा मुद्दा नाही, तर तो सामाजिक एकात्मतेचा, ऐतिहासिक संघर्षाचा आणि भविष्यातील समतेचा प्रश्न आहे. जनगणनेत अचूक नोंद, अंमलबजावणीतील सुधारणा आणि समाजातील ऐक्य टिकवून ठेवणे हेच खऱ्या अर्थाने पुढील वाटचालीचे दिशादर्शक ठरतील. उपवर्गीकरणाऐवजी एकत्रित आरक्षण अधिक सक्षमपणे राबविणे हीच काळाची गरज आहे. ■ ■

बहुजन सौरभ

# महाराष्ट्रात अनुसूचित जाती उपवर्गीकरणाची गरज नाही...

**महाराष्ट्र सरकारने अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणासाठी नेमलेल्या न्या बदर समितीने अहवाल सादर केला आहे. त्यावर हरकती मागवल्या आहेत. उपवर्गीकरण मागणी करणाऱ्या लोकात एक मोठा गैरसमज आहे की, 'एका जातीने दुसऱ्या जातीचे आरक्षण खाल्ले'. विशेषतः बौद्ध समाजाबाबत अशा प्रकारचे आरोप वारंवार केले जातात. परंतु, शासनाच्या अधिकृत आकडेवारीकडे पाहिले, तर हे चित्र पूर्णपणे वेगळे दिसते.**

महाराष्ट्र शासनाच्या जुलै 2023 च्या अहवालानुसार, राज्यातील एकूण शासकीय पदे 4,78,082 आहेत. त्यापैकी अनुसूचित जातींचे प्रतिनिधित्व 18टक्के आहे. परंतु यामध्ये बौद्धांचे प्रमाण फक्त 5.9टक्के आहे. जर बौद्ध समाजाने इतरांचे आरक्षण 'खाल्ले' असते, तर त्यांचे प्रमाण जास्त असायला हवे होते. उलट, लोकसंख्येच्या प्रमाणात पाहता बौद्धांचे प्रतिनिधित्व कमी आहे. म्हणजेच, आरोप आणि वास्तव यात मोठी तफावत आहे. त्यामुळे 'आरक्षण खाल्ले' हा दावा केवळ भावनिक आणि दिशाभूल करणारा आहे, तथ्याधारित नाही.

**लोकसंख्या विरुद्ध प्रतिनिधित्व खरी असमानता कुठे आहे?**

2011 च्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात बौद्धांची लोकसंख्या सुमारे 8.5टक्के आहे. म्हणजेच, राज्यातील प्रत्येक 100 लोकांपैकी सुमारे 8-9 लोक बौद्ध आहेत. परंतु शासन सेवेत त्यांचे प्रतिनिधित्व फक्त 5.9टक्के आहे. म्हणजेच, लोकसंख्येच्या तुलनेत सुमारे 2.6टक्के तफावत आहे.

**ही तफावत काय दर्शवते?**

बौद्ध समाजाने इतरांचे हक्क घेतले नाहीत, उलट त्यांच्या स्वतःच्या हक्कांमध्येच कमी प्रतिनिधित्व आहे. ही बाब लक्षात घेतली तर, समाजात पसरवले जाणारे आरोप हे वास्तवाशी विसंगत आहेत. सामाजिक न्यायासाठी लढताना, तथ्यांवर आधारित चर्चा होणे अत्यावश्यक आहे. अजूनही अपूर्ण सहभाग महाराष्ट्र विधानसभेत अनुसूचित जातींसाठी 29 जागा राखीव आहेत. त्यापैकी बौद्ध समाजाचे प्रतिनिधित्व फक्त 10 आमदारांपर्यंत मर्यादित आहे, म्हणजे सुमारे 3.4टक्के. लोकसंख्येच्या प्रमाणात हे प्रतिनिधित्व सुमारे 18 जागांपर्यंत असायला हवे होते. म्हणजेच, राजकीय क्षेत्रातही बौद्ध समाजाचे प्रतिनिधित्व लोकसंख्येच्या टक्केवारी पेक्षा कमी आहे. यावरून स्पष्ट होते की, प्रश्न 'आरक्षण खाल्ले' याचा नसून, सर्व समाजांना न्याय्य प्रतिनिधित्व मिळण्याचा आहे. उपवर्गीकरणाची गरज आहे का?




**वरील सर्व आकडेवारी पाहता एक गोष्ट स्पष्ट होते :-** अनुसूचित जातींमध्ये कोणत्याही एका जातीने दुसऱ्याचे आरक्षण बळकावलेले नाही. उलट, सर्वच घटकांमध्ये काही प्रमाणात असमानता आहे. अशा परिस्थितीत 'वर्गीकरण' हा उपाय नसून, तो समाजात अधिक फूट पाडण्याचा धोका निर्माण करू शकतो. सामाजिक न्यायाचा मार्ग म्हणजे एकजूट, विभागणी नव्हे. सत्य समजून घ्या, गैरसमज दूर करा आज गरज आहे ती भावनांवर नव्हे, तर तथ्यांवर आधारित विचार करण्याची. बौद्ध समाजाने कोणाचेही आरक्षण खाल्लेले नाही, हे स्पष्टपणे आकडेवारी सांगते.अनुसूचित जातीमध्ये लोकसंख्या जास्त आणि प्रतिनिधित्व कमी, राजकारणातही अपेक्षेपेक्षा कमी सहभाग. म्हणूनच, समाजात एकमेकांविरोधात संशय निर्माण करण्याऐवजी, एकत्र येऊन समान हक्कांसाठी लढणे हीच खरी गरज आहे.

**जातींच्या प्रश्नावर निर्णय कोणाचा?**

महाराष्ट्रात अनुसूचित जातींची संख्या सुमारे 59 आहे. या सर्व जातींचे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक वास्तव वेगवेगळे असले, तरी त्यांचा संविधानिक दर्जा समान आहे. अशा परिस्थितीत उपवर्गीकरणाचा प्रश्न उपस्थित केला जातो, तेव्हा सर्वात मूलभूत प्रश्न उभा राहतो, या निर्णयाचा अधिकार नेमका कोणाचा? काही मोजक्या समूहांच्या मागणीवर संपूर्ण 59 जातींच्या भवितव्याचा निर्णय घेणे योग्य ठरणार नाही. हा प्रश्न केवळ आरक्षणाचा नसून, तो सामाजिक समतोल आणि परस्पर विश्वासाशी निगडित आहे. बहुसंख्येची भूमिका लोकशाहीचा कणा असते. लोकशाही व्यवस्थेमध्ये कोणताही महत्त्वाचा निर्णय घेताना बहुसंख्येचा आवाज निर्णायक ठरतो. अनुसूचित जातींपैकी बहुसंख्य घटकांना जर उपवर्गीकरण नको असेल, तर अशा निर्णयाला नैतिक अधिष्ठान मिळत नाही.



अनिल वैद्य
माजी न्यायाधिश
मो. 9657758555

काही घटकांची मागणी म्हणजे सर्वांचा आवाज असे समजणे चुकीचे आहे. बहुसंख्यांचा विचार न करता घेतलेले निर्णय समाजात असंतोष निर्माण करतात.

**'उपवर्गीकरण – उपाय की नवीन समस्या?'**

उपवर्गीकरणाचा उद्देश काही मागास घटकांना अधिक संधी देण्याचा असू शकतो. मात्र, यामुळे अनुसूचित जातींमध्ये नवीन तणाव आणि मतभेद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एका गटाला वेगळे स्थान देताना इतर गटांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ शकते. त्यामुळे हा उपाय दीर्घकालीन सामाजिक समतोल राखेल का, हा प्रश्न विचारात घेणे आवश्यक आहे. एकात्मता जपणे काळाची गरज आहे. इतिहास साक्ष देतो की, सामाजिक न्यायासाठीचा प्रत्येक लढा एकजुटीनेच यशस्वी झाला आहे. विभागणीमुळे तात्पुरते फायदे दिसले, तरी दीर्घकालीन नुकसानच अधिक झाले आहे. जर उपवर्गीकरणाचा निर्णय सर्वानुमते नसेल, तर तो समाजात फूट पाडणारा ठरू शकतो. म्हणूनच, एकात्मता टिकवणे हीच सर्वात मोठी जबाबदारी आहे.

सहमतीशिवाय निर्णय टाळावा. महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या 59 घटकांपैकी जर बहुसंख्य जातींना उपवर्गीकरणाची गरज वाटत नसेल, तर तो निर्णय लादणे योग्य नाही. सर्व घटकांचा सखोल विचार, संवाद आणि सहमती यावरच योग्य मार्ग अवलंबून आहे. उपवर्गीकरणाचा प्रश्न हा केवळ धोरणात्मक नाही, तो सामाजिक ऐक्य, विश्वास आणि न्याय यांचा आहे. बहुसंख्य समाजाच्या इच्छेविरुद्ध कोणताही निर्णय घेणे लोकशाहीच्या तत्त्वांना धरज्या महापुरुषांनी संविधानामध्ये आरक्षणाची तरतूद केली, ते आरक्षण त्यांनी गोलमेज परिषदेत संघर्ष करून मिळवले होते. ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आज जाणून घेणे गरजेचे आहे. पूर्वाश्रमीचे अस्पृश्य म्हणजे आजचे अनुसूचित जाती समूह. अस्पृश्य म्हणून विषमतेचे सर्वांना सारखेच चटके बसले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व अस्पृश्यांना अनुसूचित जातीच्या सवलती मिळवून दिल्या. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उपकार केले आहे. त्याची अनुसूचित जातींनी एकत्र राहावे अशी भूमिका होती. त्यांनी संविधानात उपवर्गिकरण करून आरक्षण दिले नाही. सर्वोच्य न्यायालयाने निर्णय दिला आहे. सर्वोच्य न्यायालयाने अनुसूचित जातीचे वर्गीकरण करण्यास संमती दिली आहे. महाराष्ट्र सरकारने न्यायमूर्ती अनंत बदर समिती स्थापन केली होती. त्याचा अहवाल सरकारला सादर झालेला आहे त्याबाबत एक समिती प्रधान सचिवाच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली असून त्यावर हरकती सूचना मागवण्यात आलेले आहे. जेव्हा केव्हा आरक्षण आणि विशेषतः अनुसूचित जातीच्या आरक्षणाचा मुद्दा पुढे येतो तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मतांचा विचार करणे गरजेचे आहे. परंतु तसे होताना दिसत नाही. न्यायालयाने व सरकारने सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भूमिका लक्षात घेऊन या बाबतचे निर्णय घेतले पाहिजे.

क्रमशः ■ ■

# लव्ह जिहादच्या ठेकेदारांनो...

**सध्या राज्यातील जात्यांध आणि धर्मांध माकडांनी लव्ह जिहादच्या नावाखाली विशिष्ट धर्मियांना टार्गेट करून उच्छाद मांडला आहे. खरे तर लव्ह आणि जिहाद म्हणजेच प्रेम आणि युद्ध हे दोन्ही शब्द आपापल्या अर्थपूर्णतेने दोन टोके आहेत. लव्ह हा शब्द इंग्लिश तर जिहाद हिंदी. यांचे अर्थ सुद्धा एकमेकांच्या विरुद्ध आहेत. एकमेकांपासून भिन्न आहेत.**

प्रेम हे निःशस्त्र असते तर युद्ध हे शस्त्र सज्ज असते. म्हणून हे दोन्ही शब्द एकत्र जोडून लव्ह जिहाद - प्रेम युद्ध म्हणणे किंवा असा शब्दप्रयोग करणेच मूळात चूक आहे. कारण असा शब्दप्रयोग करणे हे समाजस्वास्थासाठी हानीकारक आहे. देशस्वास्थासाठी सुद्धा नुकसानदेहीच आहे आणि मानवांप्रती तर अमानवीयच आहे. कारण जिथे प्रेम असते, तिथे त्या दोन्ही प्रेमीजीवात जिहाद नसतोच मुळी. जिहाद (युद्ध) करतात ते नातेवाईक, समाज, जात आणि धर्माचे ठेकेदार! ते ही केवळ भ्रामक खानदानीच्या, इज्जतीच्या खातर! प्रेमात अखंड बुडालेले निष्पाप प्रेमी जिहाद करतच नसतात. कारण जिथे प्रेम असते, तिथे द्वेष नसतो. जिथे प्रेम असते, तिथे भेद नसतो. जिथे प्रेम असते, तिथे राग नसतो. जिथे प्रेम असते, तिथे चिड नसते. जिथे प्रेम असते, तिथे वैर नसते. जिथे प्रेम असते, तिथे तिरस्कार नसतो. जिथे प्रेम असते, तिथे घृणा नसते. जिथे प्रेम असते, तिथे बहिष्कार नसतो. जिथे प्रेम असते, तिथे नफरत नसते. तर प्रेमात एकमय होणे असते. प्रेमात एकमेकात सामावणे असते. प्रेमात एकमेकांबद्दल आपुलकी असते, माणुसकी असते, इज्जत असते, कदर असते, आदर असतो, मानसन्मान असतो. सहकार्य करण्याची आणि मरेपर्यंत साथ देण्याची वृत्ती असते. एक सहृदयी सौहार्द प्रेम असते. एकमेकांबद्दल आवड असते. गोडवा असतो. प्रेमात स्वातंत्र्य असते, हक्क आणि आधिकार असतात. समजूतदारपणा असतो. प्रेमात एकमेकांना समजून घेणे असते. प्रेमात एकमेकांना जीव लावणे असते.




एकमेकांना सांभाळणे असते. जात, धर्म, पंथ, संप्रदाय, वंश, कुंडली, खानदान, गोत्र, घराणे, गरीब - श्रीमंत, काळा - गोरा, उंच - बुटका, शिक्षित - अशिक्षित, भाषा, प्रांत ई. ई. कुठल्याच सीमारेषा नसतात. प्रेम हे आंधळे असते, ते सगळे स्विकारते. प्रेम हे निरागस असते, निर्मळ असते, पवित्र असते. प्रेम ही भावना निसर्गतःच पवित्र असते. प्रत्येकाच्या जीवनात निसर्गानेच तर प्रेम ही भावना निर्माण केली आहे. प्रेम ही भावना कोण्या जातीची, धर्माची, झेंड्याची, रंगाची आणि संघटनेची देणगी नाही. म्हणून प्रेमींवर या जातीय धर्मीय झुंडींची मक्तेदारी असता कामा नये. प्रेमाला आणि प्रेमींना लव्ह जिहाद हा शब्दसुद्धा स्वतःच्या जातीय, राजकीय, धार्मिक धंद्यासाठी आणि फायद्यासाठी कोणी चिटकवता कामा नये. लक्षात ठेवा प्रेम ना धर्म आहे, ना जात. प्रेम ना पक्ष आहे, ना संघटना. प्रेम ना उपरणे आहे, ना झेंडा. प्रेम ना भगवे आहे, ना हिरवे. प्रेम ना हिंदू आहे, ना मुसलमान. प्रेम ना भाषा आहे, ना प्रांत. प्रेम ना मराठी आहे, ना हिंदी, ना इंग्रजी. प्रेम ना मर्जी आहे ना बळजबरी. तर 'प्रेम ही एक नैसर्गिक आंतरिक शुभ भावना आहे'. प्रेम ही एक नैसर्गिक आंतरिक पवित्र भावना आहे. प्रेम हे एक गोड स्वप्न आहे. प्रेम एक सुंदर विचार आहे. प्रेम एक आनंद आहे. प्रेम एक खुषी आहे. प्रेम एक वात्सल्य आहे. प्रेम एक जिव्हाळा आहे. प्रेम एक समाधान आहे. प्रेम हे कधीच 'राजकीय' नसते. प्रेम हे कधीच 'नाटकीय' नसते. प्रेम हे कधीच आर्थिक नसते. तर प्रेम हे अंतःकरणातील निखळ सत्य असते. निःस्वार्थी असते. प्रेमात हे माझे ते तुझे अशा वाटण्या नसतात. प्रेम एकजीव असते. प्रेम एकरूप असते. प्रेमात हार नसते. प्रेमात दोघेही जिंकतात. प्रेमाचे मन समुद्रासारखे विशाल, अथांग असते. प्रेम पाण्यासारखे निर्मळ असते, स्वच्छ, शुद्ध, पवित्र, पारदर्शक असते. प्रेमात पृथ्वी नंदनवन भासते. प्रेमात पृथ्वीवरील कण न् कण प्रेममय भासतो. प्रेम एक उत्साह, उत्सव असतो. प्रेमात नम्रता, कोमलता, नाजूकता, सुंदरता असते. प्रेमात चांगली भावना असते. प्रेम हे अल्लड असते. प्रेम हे निगर्वी, शुभ, भोळे असते. प्रेम हे निस्वार्थी असते. प्रेम हे खुप प्रेमळ असते. प्रेमींचे मन खुप प्रामाणिक, सरळ, सहज आणि सुंदर असते. प्रेमात मन मोकळे असते. प्रेमींचे हृदय हे खुप खुप कोमल असते. म्हणून जिहाद म्हणजे युद्ध जे देशाच्या रक्षणासाठी करण्यात येते. जिहाद म्हणजे युद्ध जे अन्यायाच्या विरूद्ध न्यायासाठी करण्यात येते. प्रेमींचे प्रेम म्हणजे जिहाद - युद्ध नव्हे. जिहाद म्हणजे दोन प्रेमींमधील वैयक्तिक लढाई नव्हे. जिहाद म्हणजे दोन कुटुंबातील लढाई नव्हे. जिहादला वैयक्तिक, कौटुंबिक द्वेष बनवू नका. जिहादला जातीय, धर्मांध संघर्ष बनवू नका. जिहादला जात, धर्म सिमीत बनवू नका. नैसर्गिक प्रेमाला राजकीय, जातीय, धर्मीय बनवू नका. नैसर्गिक प्रेम भावनेला अमानवीय बनवू नका. नैसर्गिक प्रेमावर धर्माच्या, जातीच्या जिहादी क्रूरतेचा काळीमा फासू नका. नैसर्गिक प्रेमाला तुमच्या स्वार्थासाठी मताचे गणित बनवू नका. नैसर्गिक प्रेमाला अमूक एका समाजाने तुमच्या फायद्यासाठी एकवटावे म्हणून प्रेमाला जिहादी रंग देऊ नका. लव्ह जिहाद च्या नावाखाली मुली महिलांची यौन पहारेदारी करू नका. असे वागण्याचा आधिकार तुम्हाला कोणी दिला? लव्ह जिहादच्या नावाखाली मुली-महिलांच्या अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा गळा घोटण्याचे काम करू नका. असा अमानवीय आधिकार तुम्हाला कोणी दिला? लव्ह जिहादच्या नावाखाली एकाच धर्मियांची बदनामी करू नका. त्यांच्या विरोधात नफरत पसरवण्याचा धंदा बंद करा. लव्ह जिहादची भिती दाखवून पालकांच्या मनात तुम्ही भीती पसरवीत आहात. मुलींना जन्मतःच मारून टाकण्याच्या प्रवृत्तीला आणि मानसिकतेला तुम्ही बळकटी देत आहात. असे करण्याचा आधिकार तुम्हाला कोणी दिला? लव्ह जिहादच्या नावाखाली सामाजिक सौहार्द वाढीस लावण्याऐवजी सांप्रदायिकतेला बढावा देण्याचा आधिकार तुम्हाला कोणी दिला? लव्ह जिहादाच्या नावाखाली समाजमनावर नैतिकतेऐवजी सामूहिक दडपण आणि भिती पसरवण्याचा आधिकार तुम्हाला कोणी दिला? लव्ह जिहादच्या नावाखाली मुली महिलांच्या सुरक्षेच्या बहाण्याखाली त्यांच्या मनावर, आयुष्यावर, त्यांच्या स्वातंत्र्यावर, इच्छेवर, त्यांच्या व्यक्तिगत प्रतिष्ठेवर, त्यांच्या स्वतंत्र ओळखीवर नियंत्रण मिळवण्याचा आधिकार तुम्हाला कोणी दिला? काय मुली महिलांना त्यांच्या आपल्या स्वतःच्या शरीरावर त्यांचा स्वतःचा आधिकार नाही? काय मुली महिलांना त्यांच्या स्वतःच्या शरीराबाबत स्वतः निर्णय घेण्याचा आधिकार नाही? लव्ह जिहादच्या नावाखाली मुली महिलांवरील निर्बंध अधिक जाचक आणि विषम बनवून त्यांना जुन्या साच्यात आणि ढाच्यात, विविध बंधनात बंदिस्त बनवून कोंडण्याचे आधिकार तुम्हाला कोणी दिले? व्यक्तिगत, संस्थागत आणि संघटनात्मक ठेकेदारांनो, जातीच्या आणि धर्मांच्या ठेकेदारांनो, तुम्हाला हा लव्ह जिहादचा ठेका कोणी दिला? लक्षात ठेवा, 'प्रेमाचा आधिकार हा जीवन जगण्याच्या आधिकाराच्या समान आहे.' जे प्रेम करतात, ते एकमेकांच्या 'खुषीत' राहतात. पण ठेकेदार मात्र 'दुषित' होतात. अशा सर्व दुषितांच्या मेंदूवर किटकनाशक फवारणी करून त्यांना 'लव्ह जिहादी' ऐवजी 'मानवतावादी' बनण्याचा संदेश देणे आज खुप गरजेचे बनले आहे. म्हणून जिहादी ठेकेदारांनो, 'पवित्र प्रेमभावनेला 'वासना' या नजरेतून बघू नका, तर प्रेमाकडे खुप पवित्र 'उपासना' या भावनेतून बघा. ■ ■



ॲड. सुभाष सावंगीकर
मो. 9325209492

## बहुजन मानस





नागेश चौधरी (बहुजन विचारवंत)
९९७०८७३५६०

# थोर नेते, त्यांचे महात्म्य आणि त्यांचे ध्येय

**आपण आपल्या नेत्याप्रती जी भावना व्यक्त करतो की भक्ती संप्रदायापैकी असते की रॅशनल असते याचा विचार केला पाहिजे. परवा मोहन भागवत या सरसंघचालकाने असे म्हटले की आम्ही गोळवलकर गुरुजींचे बनतात मधील विचार मान्य करत नाही, कारण ते कालसुसंगत नाही. खरे म्हणजे हे जे बदल संघाचे लोक करतात त्यामागे त्यांची सूची समजी चाल असते आणि ती चाल म्हणजे त्यांना व्यक्ती पेक्षा त्यांचे ध्येय त्यांचे वर्चस्व हे जास्त महत्त्वाचे वाटते. हे नुसते मोहन भागवतांनीच म्हटले नाही तर त्याआधी गोळवलकरांनी देखील अशीच भूमिका मांडली होती. त्यांच्या वही पुस्तकामध्ये त्यांनी असे म्हटले की, टिळकांनी केव्हा आपल्या आर्थिक गोविंद आज या पुस्तकात आर्य उत्तर ध्रुवावरून आले असे म्हटले होते. त्याला विरोध करताना घोळकरांनी असे लिहिले आहे की टिळकांना पूर्ण ज्ञान नव्हते.**

खरे म्हणजे टिळक हे सर्व हिंदुत्ववाद्यांचे आद्य गुरु आहेत. परंतु तरीही ते त्या महान व्यक्तीला थोर व्यक्तीला एवढे ध्येयाएवढे महत्त्व देत नाही. कारण त्यांना व्यक्ती पेक्षा त्यांचे वर्चस्वाचे ध्येय सर्वात वर असते. टिळक हे सावरकरांचे गुरु होते, गोरोलकरांचे गुरु होते, हेडगेवारपासून सर्व लोक टिळकांना मानत होते. कारण त्यांनी पहिल्यांदा हिंदू राष्ट्राची भूमिका मांडली होती. आता हे दिसते परंतु एवढे सगळे विचार मांडले असताना देखील जेव्हा ते टिळकांना नाकारू शकतात याचा अर्थ ते व्यक्तीला महत्त्व देत नाही. व्यक्ती त्यांच्यासमोर दुय्यम आहे आणि म्हणून गोळवलकरांनी देखील पुढे जाऊन सावरकरांची हिंदुत्ववादी भूमिका काही प्रमाणात नाकारली

याचा अर्थ हा होतो की ते ध्येयाला किती महत्त्व देतात. आज मोहन भागवतांनी असे विधान केले की गोळवलकरांची पुस्तके आम्हाला मान्य नाही. त्यातील काही विचार आम्हाला मान्य नाही. याचा अर्थ मोहन भागवत हे माजी सरसंघचालक गोळवलकरांच्या विचारांना मान्यता देत नाही. याचा पुन्हा अर्थ हाच होतो की ते त्यांच्या आदर्श पुरुषाला विचारकाला बाजूला ठेवून आपल्या स्वार्थासाठी भूमिका बदलत असतात

आणि आमची काय स्थिती आहे. आम्ही आपल्यातल्या महापुरुषाला एवढे जपतो की त्याला कोणी काही बोलले तर आम्ही त्याचा वाटेल तसा विरोध करतो. आमच्या महामानवाला कुणी एकेरी पद्धतीने नाव घेतले तर आम्ही त्याचा निषेध करतो. उदाहरणार्थ शिवाजीला आदराची शब्द वापरला नाही तर आमच्या शिवाजी भक्तांना त्याचा राग येतो शिवराय म्हणा शिवाजी राजे म्हणा तरच तुम्ही शिवाजीचे नाव घेऊ शकता असे आम्ही समजू. दुसरे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल सुद्धा आहे. साहेब कारण काही लोक नुसते डॉ. आंबेडकर म्हणतात. बाबासाहेब म्हणत नाही म्हणून राग व्यक्त करणारे भक्त आहेत. खरं म्हणजे डॉ. आंबेडकर यांनी जो लीडर्स इन हिंदू जन हा ग्रंथ लिहिला त्यात त्यांनी या भूमिकेला स्पर्श केलेला आहे. त्यांनी हेही म्हटले आहे की ब्राह्मण हे आपल्या वर्चस्वासाठी स्वार्थासाठी वारंवार भूमिका बदलत असतात. ते त्यांच्या देवांची त्यांच्या ग्रंथांची मग ते वेद असो, पुराणे असो, की स्मृति ग्रंथ असो हे सर्व ग्रंथ देखील ते त्यांना खाली आणि वर करतात ही स्थिती त्यांच्या देवांच्या बाबतीत देखील आहे. ते कधी ब्रम्हाला उच्च समजतात आणि विष्णू व शंकराला कमी समजतात आणि वेळ बदलली तर ते ब्रह्माला खाली करून विष्णूला वर चढवतात आणि कधीकधी ते शंकराला शिवाला सर्वात वर समजतात त्याचें कारण हे आहे की ते व्यक्तीला महत्त्व देत नाही. ते त्यांच्या वर्चस्वाच्या भूमिकेला महत्त्व देतात.

आपल्या वर्चस्वासाठी आपल्या जातीच्या लोकांना देखील केवळ नाकारतच नाही तर त्यांचे खून सुद्धा पडतात पाडतात. उदाहरण द्यायचे झाले तर संघाचेच दीनदयाल उपाध्याय यांचे उदाहरण देता येईल. असे म्हणतात की दीनदयाल उपाध्याय यांनी मुस्लिम आमचे रक्त बंधू आहेत अशी मांडणी केली म्हणून त्यांचा खून करण्यात आला याचा अर्थ ते आपल्या कट्टर अनुयायाला देखील एखाद्या चुकीसाठी मारून टाकतात. ते केवळ आपल्याच माणसाला मारतात असे नव्हे तर त्यांच्या जातीच्या माणसाला देखील ते मारतात. उदाहरणार्थ दाभोळकर हे ब्राह्मण असून त्यांचा देखील त्यांनी खून केला त्याचप्रमाणे करकरे त्यांचा देखील त्यांनीच खून केला. ते जातीने ब्राह्मण असले तरी ते त्याची पर्वा करत नाही

'ते आपल्याच विचारवंताना, नेत्यांनाही नाकारतात!'

माजी संरसघचालक गोळवलकर यानी We or our Nationhood defined या त्यांच्या पुस्तकात बाळ गं. टिळक यानी जे म्हटले होते की आम्ही आर्य उत्तर ध्रुवावरून आलो ते चूक आहे असे पुस्तकात गोळवलकर लिहितात. म्हणजे टिळकांना चूक ठरवतात. आपल्या राष्ट्रीय, मोठ्या नेत्याच्याही चूका काढतात. आजकाल तर ते गोळवलकर यांना सुद्धा चूक ठरवताना दिसतात. परवा सरसंघचालक मोहन भागवत यांनी जे म्हटले ते गोळवलकर यांना नाकारणारे आहे. गोळवलकर यांची 1 जानेवारी 1969 ला मुंबईच्या नवा काळ या दैनिकात मुलाखत प्रसिध्द झालती. तीत गोळवलकर म्हणाले 'वर्ण- जाती ईश्वराने निर्माण केल्या.'

आणि मोहन भागवत म्हणतात

'जाती ब्राम्हणांनी निर्माण केल्या.'

कोण खरं आणि कोण खोटं?




**संघाचे मुखंड अशा ज्या उलटसुलट भूमिका घेतात ते का?**

या म्याडपणा मागे (method in madness) एक मेथड आहे, उद्देश आहे. आणि तो आहे आम्ही आमचे वर्चस्व टिकवण्यासाठी आमच्या विचारवंताची, नेत्याची ऐसी की तैसी करायला कमी करत नाही.

आम्ही बहुजन अशी हिंमत करू शकतो का? आमच्या नेत्याची, विचारकाची चूक दिसली तरी ती दाखवण्याची? आपण मात्र आपल्या थोर पुरुषांना देवासारखे समजतो. त्यांना कोणी बोलले, त्रुटी दाखवल्या तर त्यांचा वाटेल तसा विरोध करतो. कारण आपल्यासमोर ध्येय महत्वाचे नाही. आपल्यासमोर आपले नेते हे जणू देवासारखे आहेत, त्यांच्या मांडणीतील कोणी उणीव दाखवली तर आपल्याला प्रचंड राग येतो. परंतु त्यांनी जे समतेचे ध्येय आपल्यासमोर ठेवले त्याचा तेवढा विचार करत नाही.

या देशाचे सुप्रीम कोर्टाचे माजी जस्टिस बोबडे यांनी असे विधान केले की संस्कृत ही राष्ट्रभाषा असायला हवी आणि पुढे हेही म्हटले की डॉ.आंबेडकरांना देखील संस्कृत राष्ट्रभाषा करावी असे वाटत होते. असे म्हणणे म्हणजे डॉ. आंबेडकर हे देखील बोबडे यांच्या मताचे होते असे म्हणण्यासारखे आहे. संस्कृत ही हिंदुराष्ट्राची राष्ट्रभाषा असावी आहे ही रा. स्व. संघाची भूमिका आहे. कारण संघ म्हणतो या देशाची राष्ट्रभाषा ही संस्कृत असायला पाहिजे. म्हणजे संघाचे भाषेबाबतचे विचार आणि डॉ. आंबेडकरांचे विचार हे समान आहेत असे दिसते. आता ही जी बाब आहे की डॉ.आंबेडकर आणि संघ किंवा बोबडे हे भाषेच्या बाबतीत समान भूमिका घेतात. आता या ठिकाणी आपण काय भूमिका घ्यायला पाहिजे? आपली आणि संघाची राष्ट्रभाषा संस्कृत राहू शकते का? तर या ठिकाणी डॉ. आंबेडकरांनी जे काही म्हटले आहे ते आपल्याला पूर्णतः मान्य आहे का? कारण या देशातील बहुजन समाज दलित ओबीसी आदिवासी हे संस्कृत पासून कोसो दूर आहेत आणि त्यांना संस्कृतचा लवलेशही नाही तेव्हा आपण भाषेच्या बाबतीमध्ये जी भूमिका डॉ.आंबेडकरांची पण होती असे म्हणतात त्याला मान्यता द्यायची का? दिली नाही तर आपण डॉ. आंबेडकर विरोधी ठरतो का यावर विचार करायला पाहिजे. कारण प्रत्येक पिढीवर पिढी समोरचे प्रश्न हे वेगवेगळे असतात. आव्हाने वेगवेगळी असतात म्हणून व्यक्तीमध्ये न अडकता आपण समतेचे ध्येय साकार करण्यासाठी पुढे यायला पाहिजे. व्यक्तीपूजेला बाजूला सारून ज्याप्रमाणे ब्राह्मण किंवा आरएसएस हे त्यांच्या वर्चस्वासाठी त्यांच्या महान व्यक्तीला देखील बाजूला सारतात, कारण त्यांना व्यक्ती महत्त्वाची नसते त्यांना त्यांचे वर्चस्व किंवा त्यांच्या वर्चस्वाद ध्येय हे साकार करण्यासाठी ते व्यक्तीला बाजूला ठेवतात गांधीचा खून केला यात त्याला कारण देखील त्यांच्या डोक्यातलं हिंदू राष्ट्र होतं म्हणून आपण व्यक्तिपूजक होण्यापेक्षा राहण्यापेक्षा भैय्याला महत्त्व दिले पाहिजे समतेला महत्त्व दिले पाहिजे. गोळवलकरांनी बंच ऑफ थॉट्स या पुस्तकात अशी ही मांडणी केली आहे की आमचा कोणी गुरु नाही आमचा कुठलाही एक ग्रंथ धर्मग्रंथ नाही आम्ही पुन्हा पुन्हा ही विचारांना बांधील नाही आणि आमचे ध्येय भगव्या ध्वजामध्ये आहे. मुस्लिम ज्याप्रमाणे कुरानात अडकले आहे किंवा ख्रिश्चन ज्याप्रमाणे बायबल मध्ये अडकले आहे तसे आम्ही कुठल्याही धर्मग्रंथांमध्ये अडकलो नाही. याचा अर्थ हा की आम्ही वेळोवेळी बदलू, नेते बदलू, विचार बदलू. आणि ते यासाठी की आम्हाला आमचे वर्चस्व, या देशावरची मालकी मजबूत करायची आहे. कायम करायची आहे.

आम्ही बहुजन मात्र व्यक्तिमहात्म्यामध्ये अडकलेलो आहोत. त्या व्यक्तीचे विचार हेच आमच्यासाठी अंतिम आहेत, ते बदलता येत नाही अशा गुंत्यात अडकलो आणि म्हणून आपली प्रगती होत नाही. म्हणून आपण त्यांच्या वर्चस्वाला आव्हान देऊ शकत नाही. त्यांचे वर्चस्व संपवू शकत नाही ते ध्यानात घ्यायला पाहिजे व्यक्तीमध्ये अडकू नका ही व्यक्ती कितीही महान असली तरी ती बदलत्या संदर्भामध्ये काही प्रमाणात संदर्भहीन होते आणि म्हणून आपण बदलत्या परिस्थितीमध्ये बदलायला पाहिजे. बदलत्या काळाच्या आव्हानाप्रमाणे त्याला सामोरे जायला पाहिजे. कारण त्यांच्या समोरची आव्हाने आणि आजची आव्हाने भिन्न असतात. आपल्या थोरांचे विचार जसेच्या तसेच मान्य करावे या विचारातून पुढे जायला पाहिजे असे मला वाटते. यामध्ये काही लोकांना वाटेल की यांना थोर पुरुषांचा मान नाही, थोर पुरुषांचा आदर नाही. अशी गोष्ट नाही. गोष्ट अशी आहे की आम्हाला वाटते या देशांमधली विषमता संपायला पाहिजे की संपवण्यासाठी जे जे नव्याने स्वीकारावे लागेल ते स्वीकारायला हवे. आपल्या नेत्यांच्या काही चुका झाल्या असतील, काही राहून गेले असतील त्याला टाळून आपण पुढे गेलो पाहिजे. त्यांनाच कवटाळून राहलो तर आपण पुढे जाऊ शकत नाही. आपण समतेचे ध्येय साकार करू शकत नाही.

विषमतावादी लोक जर वेळोवेळी बदलतात आणि आपले वर्चस्व कायम ठेवतात. मग जे समतावादी लोक जे समस्या आहे ध्येय त्यांच्या विषमतावादी हे अपेक्षा कितीतरी उदास आहे श्रेष्ठ आहे त्यासाठी आपण बदलायला नको आपली भक्ती कमी करायला नको आपण म्हणतो ते अंधश्रद्धावादी आहेत मग आपण काय कमी अंधश्रद्धावादी आहोत. आपण आपल्या नेत्याच्या भक्तीमध्ये जर राहलो तर ती देखील अंधश्रद्धा आहे म्हणून नेत्यावरची श्रद्धा ही अंधश्रद्धा होईल. कारण जर आपण नेत्यालाच ध्येय समजलो तर पुढे जाऊ शकत नाही. ■ ■

# जीना उसका जीना है, जो और को जीवन देता है...

**कोणताही महापुरुष किंवा महामानव अचानकपणे किंवा जादूच्या कांडीने निर्माण होत नाही, तर त्याकरता त्यांना योग्य दिशेने, सातत्यपूर्ण आयुष्याच्या बराच वेळ सकारात्मक विचार करावा लागतो**




सकारात्मक विचारांच्या, चिंतनाच्या सहवासा करता अनेक पुस्तकांचे, सकारात्मक विचारांचे वाचन चिंतन नियमित करावे लागते. मानव ज्याप्रमाणे आपल्या मनात जे पेरेल तेच उगवते. कडू पेरले तर कडू गोड पेरले तर गोड. महान व्यक्ती हे श्रेष्ठ प्रतीचे परिवर्तनाचे मार्गदर्शक असतात. ते नेहमी समाजाला योग्य दिशा व सुगतीच्या मार्ग दाखवीत असतात. त्यांचे मानव जातीवर निस्सीम प्रेम असते. मानव जातींच्या सुखासाठी ते आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घालत असतात. मानवा मानवामध्ये असलेली विषमता, भेदाभेद, अमंगल गोष्टी, जुन्या जाचक रूढी, अयोग्य परंपरा, चुकीचे गैरसमज या बाबीमुळे सामान्य मानवाचे जीवन त्रस्त व दुःखी होत असते. त्याकरिता महामानव संत हे नेहमीच मानवाच्या कुशल कर्माला व मानवाच्या सत्य बाबीला आधार देत समाज प्रगतीसाठी नैतिक कार्य सदैव करीत असतात. मानवाची व समाजाची स्वच्छ प्रतिमा उजाळावी, मी निकोप समाज घडावायाकरिता ते नियमित प्रबोधन व मार्गदर्शन करीत असतात. त्याकरिता ते स्वतःच्या शुद्ध आचरणातून सिद्ध करीत असतात व तशी जीवनदृष्टी ते नवसमाजाला देत असतात.त्याकरिता त्यांना कितीही मान अपमान, स्तुती प्रशंसा, प्रसंगी कितीही विरोध झाला तरी त्यांच्या सम्यक क्रांतीचा संघर्ष संपत नाही. शेवटच्या क्षणापर्यंत ते समाजाकरिता झटत असतात. त्यांचे काळात अतिशय घाणेरडे विचार असणारे, जाचक विषमतावादी, रूढी परंपरा तशीच कायम राहावी अशा विचाराचे काही माणसं, पशुवत विचारांचे व्यक्ती, हे संतांना व महामानवांना वेळोवेळी त्रास देत असतात. नेहमी त्यांना कमी लेखत असतात त्यांना बदनाम करीत असतात. प्रसंगी त्यांच्या वाटेवर अडवणुकीचे अपप्रचाराचे द्वेषाचे काटे सुद्धा टाकत असतात. तरीसुद्धा महापुरुष संत हे अशा घाणेरडे विचारांनी शुल्लक विचारांनी घाबरत नसतात. भीतीग्रस्त होत नसतात तर ते खंबीर वृत्तीचे असतात.कारण त्यांच्यामध्ये खंबीर नेतृत्व, उच्च प्रतीची समजदारी असते. कितीही कठीण प्रसंग आला तरीही त्याला धैर्याने समोर जाण्याची जय्यत तयारी व समाजाप्रती असलेले कल्याणकारी उद्दिष्ट यामुळेच महापुरुष संत हे आपले कार्य प्रामाणिकपणे पार पडत असतात. ■ ■

## मंगलवाटा



सम्राट माटे (मंगलदर्शी)
मो.9075113644

“ एक छान स्माइल, एक दिवस बदलू शकते... ”



# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक लोकशाहीबद्दल विचार

**महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने आपल्याला एकच बोध घ्यायला बंधनकारक ठरतो तो म्हणजे, ‘आर्थिक लोकशाही हीच सामाजिक न्यायाची खरी पायरी आहे आणि सामाजिक न्यायाशिवाय भारताची लोकशाही अपूरी आहे.’**

महामानवांचे विचार केवळ ग्रंथात राहू नयेत; ते व्यवहारात यायला हवेत त्यासाठीच डॉ. बाबासाहेबांनी दाखविलेला शिक्षण, स्वाभिमान, श्रम, आणि आर्थिक समतेचा मार्ग स्वीकारणे हाच त्यांना आणि त्यांच्या विचाराला सर्वोत्तम अभिवादन ठरेल. महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने आपण पुन्हा एकदा त्यांच्या महान कार्याचे स्मरण करताना हे वचन देऊयात, ‘समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांवर आधारित आर्थिक लोकशाही निर्माण करून डॉ. बाबासाहेबांचे स्वप्न साकार करू.’ भारताच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अद्वितीयच आहे. ते केवळ संविधानाचे शिल्पकार नव्हते, तर ते अत्यंत दूरदृष्टीचे अर्थतज्ञ, समाजसुधारक आणि आर्थिक न्यायाचे पुरस्कर्ते होते. त्यांनी ‘राजकीय लोकशाही’ पुरेशी नाही, तर ‘आर्थिक लोकशाही’ हीच खऱ्या अर्थाने समाजाला समतेच्या मार्गावर नेणारी शक्ती आहे, असे ठाम मत मांडले, त्यांची आर्थिक लोकशाही संकल्पना ही फक्त अर्थव्यवस्थेची योजना नसून सामाजिक परिवर्तनाचे घोषणापत्र होती. आंबेडकरांनी जगातील अर्थव्यवस्थांचा सखोल अभ्यास करून भारतासारख्या बहुस्तरीय, विषम आणि जातिव्यवस्थेने ग्रस्त समाजासाठी एक न्याय्य आर्थिक व्यवस्था कशी असावी याचा आदर्श मार्ग दाखविला. त्यांच्या आर्थिक विचारांचा केंद्रबिंदू म्हणजे ‘समान संधी, न्याय संसाधनवाटप, शोषणमुक्त आर्थिक रचना आणि राज्याची लोककल्याणकारी भूमिकाच होते.’ डॉ. आंबेडकरांच्या मते लोकशाहीचे स्वरूप केवळ मतदानाने किंवा राजकीय शक्तीने परिभाषित होत नाही. लोकशाहीची खरी कास आर्थिक समतेत आहे. ते म्हणतात की, राजकीय लोकशाही ही फक्त एक प्रवेशद्वार आहे; तिची खरी फळे आर्थिक लोकशाहीत दिसली पाहिजेत. संपत्ती, संसाधने आणि संधींचे न्याय्य वितरण नसल्यास लोकशाही ही एक आभासी व्यवस्था राहते. डॉ. बाबासाहेबांच्या आर्थिक लोकशाहीचे मुख्य घटक म्हणजे, सर्व नागरिकांना समान संधी, संपत्तीचे न्याय्य वितरण, श्रमाला प्रतिष्ठा, शोषणरहित आर्थिक रचना, राज्यकर्त्यांची लोककल्याणाची जबाबदारी त्यांचे मत होता की सामाजिक लोकशाहीची पूर्तता आर्थिक समतेशिवाय अशक्य आहे. भारतातील आर्थिक विषमतेच्या मूळात जातिव्यवस्था आहे, असे आंबेडकरांचे स्पष्ट मत होते. त्यांच्या मते जात हा केवळ सामाजिक दर्जा ठरवणारा घटक नाही, तो आर्थिक भूमिका, व्यवसाय आणि उत्पन्नाची पातळी ठरवणारा निर्णायक घटक आहे. उच्च आणि निम्न जातीत विभागणी केवळ मानसिक गुलामी निर्माण करत नाही, तर श्रमवाटप, संसाधनांवरील हक्क आणि रोजगाराच्या संधींवरही परिणाम करते. त्यांनी ‘Annihilation of Caste’ मध्ये लिहिले की आर्थिक शोषणाची मुळे ही सामाजिक बहिष्कारात आहेत. जोपर्यंत समाजात समानता नाही, तोपर्यंत संपत्तीचे वितरणही न्याय्य होऊ शकत नाही. त्यामुळे




आर्थिक लोकशाहीची लढाई ही सामाजिक क्रांतीशी जोडलेली आहे. आंबेडकर भारतातील कामगार चळवळीचे एक दिशादर्शक नेते होते. त्यांनी कामगारांच्या हक्कासाठी महत्त्वपूर्ण कायदे व सुधारणा सुचवल्या आहेत. त्यात प्रमुख मुख्य योगदान म्हणजे आठ तासांचा कामाचा दिवस भारतात लागू करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. किमान वेतनाची संकल्पना प्रत्यक्षात आणली. कामगारांचे सामाजिक सुरक्षा हक्क, मातृत्व लाभ, पेन्शन, विमा, कामगार कल्याण निधी याबाबत कायदे केले. औद्योगिक विवाद कायदामध्ये सुधारणा करून कामगार आणि नियोक्ता संबंध संतुलित करण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत. त्यांच्या मते श्रमाला मान मिळणे म्हणजे आर्थिक लोकशाहीचा पाया दृढ होणे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्याला आर्थिक नियंत्रक म्हणून पहात होते. ते म्हणत ‘राज्याने हस्तक्षेप न करता आर्थिक लोकशाही प्रस्थापित होऊ शकत नाही.’ मुक्त भांडवलशाही भारतासारख्या समाजाला विषमता आणि शोषणाच्या दरीत ढकलू शकते. यासाठी त्यांनी पुढील उपाय सुचवले आहेत. ते म्हणजे राज्य नियंत्रणातील कृषी व औद्योगिक जमीन यासंदर्भात त्यांचा प्रस्ताव होता की, शेती ही सामुहिक शेती पद्धतीने चालवावी, मालकी राज्याकडे असावी आणि शेतकऱ्यांना भूमिहीनतेपासून मुक्त करावे. प्राथमिक उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करून रोजगार, उत्पादन आणि संसाधनांची उपलब्धता सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचावी म्हणून कोळसा, लोखंड, पाणी, वीज, रेल्वे, खनिजे या क्षेत्रांचे राज्य मालकीची आवश्यकता त्यांनी सांगितली आहेत. डॉ. आंबेडकर हे भारतात नियोजनाची कल्पना मांडणारे पहिले अर्थतज्ञ होते. त्यांनी ‘The Problem of the Rupee’ मध्ये चलनविषयक सुधारणा, स्थिर मनी पॉलिसी आणि किंमतींचे नियंत्रण यावर सविस्तर विवेचन केले आहे. त्यांच्या मते नियोजनाची आवश्यकता ही सामाजिक न्यायासाठी आहे. बाजारवाद गरीबांसाठी अत्यंत धोकादायक आहे. आर्थिक वाढ ही फक्त जीडीपी वाढ नाही; ती मानव कल्याण आणि समान संधी यांच्याशी संबंधित असली पाहिजे. त्यांची ही भूमिका नंतर भारताच्या पंचवार्षिक योजनांमध्ये दिसून येते. डॉ. आंबेडकर भारताचे पहिले जलकेंद्रित अर्थचिंतक होते. त्यांनी म्हटले की पाणी, सिंचन व ऊर्जा हीच आर्थिक प्रगतीची मुख्य साधने आहेत. दुष्काळ, शेतीतील अनिश्चितता आणि गरीबी दूर करण्यासाठी मोठ्या धरणांची, कालव्यांची आवश्यकता आहे. त्यांच्या पुढाकाराने दामोदर व्हॅली प्रकल्प, महानदी व्हॅली प्रकल्प, सोन नदी प्रकल्प आकाराला आले आहेत. त्यांचे विचार नंतर भारताच्या औद्योगिक क्रांतीचे आधारस्तंभ ठरले आहे. आंबेडकर म्हणतात ‘शिक्षण हे आर्थिक मुक्तीचे शस्त्र आहे.’ आर्थिक लोकशाहीसाठी त्यांनी शिक्षणाला सर्वात महत्त्वाचे साधन मानले. त्यांची भूमिका म्हणजे शिक्षण सर्वांसाठी मोफत आणि उपलब्ध हवे. विज्ञान व तंत्रज्ञान शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे. अनुसूचित जाती जमातींसाठी शैक्षणिक आरक्षण आवश्यक आहे. अवसरांची, संधीची समानता ही शिक्षणाशिवाय अशक्य आहे. त्यामुळे शिक्षणाला त्यांनी आर्थिक क्रांतीचे हृदय मानले आहे. सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी राज्य यासाठी आंबेडकरांची आर्थिक लोकशाही ही केवळ उत्पादन वाढविण्यावर मर्यादित नव्हती. ती कल्याणकारी राज्याच्या तत्त्वांवर आधारित होती. त्यांच्या मते राज्याची जबाबदारी हि बेरोजगारांना संरक्षण, आजारपण, वृद्धावस्था यासाठी सामाजिक सुरक्षा, स्वस्त निवास योजना, सार्वजनिक आरोग्य सुविधा, लोकांना जीवनमान उंचावण्याची संधी आहे. आज भारतातील अनेक सामाजिक आर्थिक योजना या त्यांच्या विचारांचा विस्तार आहेत. आंबेडकरांनी स्त्री आर्थिक हक्कांसाठी ऐतिहासिक कार्य केले. हिंदू कोड बिलद्वारे त्यांनी स्त्रियांना, मालमत्तेचे हक्क, विवाह आणि घटस्फोटातील समानता, संपत्तीतील स्वतंत्र हक्क देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते स्त्री समाज आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला नाही तर आर्थिक लोकशाही अपूर्ण राहते. आर्थिक लोकशाहीची आजची आवश्यकता प्रतिपादन करताना ते म्हणतात, जागतिकीकरण, आर्थिक विषमता, बेरोजगारी, कार्पोरेटायझेशन, पाण्याचे खासगीकरण, शेतीचे संकट, आदिवासींचे विस्थापन या समस्या पाहता आंबेडकरांचा आर्थिक लोकशाहीचा मार्ग आज अधिक महत्त्वाचा वाटतो. त्यांचे विचार पुढील मार्गदर्शक सूत्रे देखील देतात. समान संधी ही आर्थिक प्रगतीची किल्ली आहे. राज्याचे आर्थिक नियमन गरजेचे आहे. सामाजिक न्यायाशिवाय आर्थिक वाढ ही अपुरी आहे. सार्वजनिक संसाधने खासगीकरणातून मुक्त ठेवणे आवश्यक आहे. कामगार, शेतकरी आणि दुर्बल घटक हा अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार आहे. त्यांचे विचार भारताच्या आर्थिक धोरणांच्या मुळाशी असायला हवेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक लोकशाहीविषयीचे विचार हे भारताच्या सामाजिक आर्थिक परिवर्तनाचा मूलाधार आहेत. त्यांनी सांगितलेली आर्थिक समानता, संसाधनांचे न्याय्य वितरण, कामगारांचे हक्क, स्त्रियांचे सामर्थ्यीकरण, शिक्षणाचा प्रसार आणि राज्याचा लोककल्याणाचा दृष्टिकोन हे सर्व आजही तितकेच महत्त्वाचे आहेत. आंबेडकरांची आर्थिक लोकशाही ही केवळ आर्थिक विकासाची गाथा नाही तर सामाजिक क्रांतीचे घोषणापत्र आहे. ‘एक असा भारत जिथे कोणत्याही मनुष्याला दारिद्र्य, जाती किंवा अपमानामुळे झुकावे लागू नये.’ त्यांचे असे ध्येय होते. आजही भारताच्या आर्थिक आणि लोकशाही विकासासाठी त्यांचे विचार दीपस्तंभासारखे मार्गदर्शन करतात. 6 डिसेंबर महापरिनिर्वाणदिन हा फक्त एका महान व्यक्तिमत्त्वाच्या स्मृतीचा दिवस नाही तर तो विचारांचे पुनर्जागरण, आत्मपरीक्षण आणि नवीन मार्गदर्शनाचा दिवस आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली आर्थिक लोकशाहीची संकल्पना ही आजही भारताच्या प्रगतीचा मूलमंत्र आहे. जाती-वर्ग-धर्म यांच्या पलीकडे जाऊन सर्व नागरिकांना समान आर्थिक संधी, शोषणमुक्त जीवन आणि मानवी प्रतिष्ठा मिळावी हा त्यांचा स्वप्निल विचार होता. आजच्या जागतिक स्पर्धा, आर्थिक विषमता, बेरोजगारी आणि सामाजिक तणावाच्या काळात डॉ. बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान अधिकच महत्त्वाचे ठरते. ■ ■

प्रा. डॉ. राजेश चालीकवार
मो. 9604080901

## रूबाब

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ते एक यशस्वी उद्योजक बनले होते. नव्याने उद्योग सुरू करू पाहणाऱ्या काही युवकांनी एका त्यांचे मार्गदर्शन मिळावे म्हणून एका मेळाव्याचे आयोजन केले होते. त्यावेळी बोलतांना ते म्हणाले माझ्या तरूण मित्रांनो! तुम्हाला काहीतरी करायचे आहे या गोष्टीतून तुमची तळमळ जाणवली. मित्रांनो! तुम्ही जी मेहनत यशस्वी होण्यासाठी कराल ती कधीही धोका देत नाही. भलेही त्यासाठी वेळ लागेल. व्यवसाय म्हटले की, चढउतार हे येणारचं. सुर्यसुध्दा मावळतो पण पुन्हा ऊगवण्याची जिद्द असल्याने तो कधीही कायमचा लोप पावत नाही. व्यवसाय करतांना लक्षात ठेवा की, जे तुम्हाला येते ते करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करा. जे येत नसेल ते शिकण्याची तयारी ठेवा. फक्त विचार करू नका तर सुरूवात करा. फक्त सांगत बसु नका तर सिद्ध करून दाखवा. बोलण्यापेक्षा करून दाखवले तर तुम्ही न सांगताही समाज स्वतःहून तुमची दखल घेईल. आयुष्य ही देखील एक प्रयोगशाळाच आहे. जेवढे जास्त प्रयोग कराल निकाल हा तेवढाच ऊत्तम लागेल. व्यवसायात खर्चावर नियंत्रण नसेल आयुष्याची ‘व्यवस्था’ विस्कळीत होईल. व्यर्थ चर्चा मनाची ‘अवस्था’ बिघडवू शकते. लक्षात ठेवा माणूस केवळ साधनांची ऊपलब्धता आहे म्हणून यशस्वी होतो असे नव्हे तर त्यासाठी निरंतर साधना आवश्यक असते. ज्याप्रमाणे ‘भवन’ मोठे असुन चालत नाही तर त्याची ‘भावना’ महान असावी लागते. केवळ मोठमोठ्या शब्दांच्या ‘ऊच्चारणापेक्षा’ ‘ऊच्च आचरण’ हे आवश्यक असते. जर काही कारणाने यश मिळाले नाही तर निराश होऊ नका. वेगळा मार्ग अवलंबण्याचा प्रयत्न करा. ध्येय तेच ठेवा फक्त योग्य पर्याय निवडा. ज्याप्रमाणे झाड आपली पाने बदलतो पण मुळांना कधीही बदलत नाही. कोणतेही संकट किंवा समस्या ही तेवढी शक्तिशाली कधीच नसते जेवढे आपण समजतो. तुम्ही कधी ऐकलं काय की, अंधाराने पहाट होऊच दिली नाही. पहाट ही होणारचं. त्यासाठी हवे ते धैर्य आणि वेळ. ही ती दोन ब्रम्हास्त्रे आहेत जी माणसाच्या अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याचे सामर्थ्य बहाल करतात. शेवटी एकचं गोष्ट सांगतो की, व्यवसाय करा, यश मिळवा पण हे विसरू नका की, आयुष्यात कोणतीही गोष्ट कितीही किमती असली तरीही झोप, मनःशांती आणि आनंदाएवढी मौल्यवान निश्चितच नाही. यशाचा मार्ग हा नेहमीच खडतर असतो. सहजासहजी मिळालेले यश औटघटकेचा आनंद देऊ शकेल पण कष्टाने मिळवलेल्या यशाचा आनंद हा चिरकाल टिकून राहतो. ‘ वह पथ क्या?, पथिक कुशलता क्या?, जिस पथ पर बिखरे शूल न हो, नाविक के धैर्य की परीक्षा क्या? यदि धाराएँ प्रतिकूल न हों ‘तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल याची मला खात्री आहे. पण मिळवलेल्या यशाने तुमच्या व्यक्तिमत्वाचा रूबाब हा असा असावा की,

**‘ रुतबा समंदर जैसा रखो, शेर भी पानी पिएँ तो सर झुकाके ‘तुम्हाला आभाळभर शुभेच्छा ! ■ ■**

बहुजन सौरभ

# भारताबाहेरही प्रेरणास्थान ठरलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**जगात अनेक महान व्यक्तिमत्त्वे झाली, परंतु ज्यांनी आपल्या विचारांनी आणि कार्याने देशाच्या सीमांच्या पलीकडे जाऊन संपूर्ण मानवजातीवर प्रभाव टाकला, अशा व्यक्तिमत्त्वांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान सर्वोच्च आहे.**




ते केवळ भारताचेच नव्हे तर जागतिक स्तरावर प्रेरणास्थान बनले आहेत, ही बाब आज विविध उदाहरणांतून स्पष्टपणे दिसून येते. अमेरिकेतील Columbia University हे जगप्रसिद्ध विद्यापीठ, जिथे जगभरातील बुद्धिमान विद्यार्थी शिक्षणासाठी येतात, त्या ठिकाणी 20 जुलै 1913 रोजी डॉ. आंबेडकरांनी प्रवेश घेतला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून आलेल्या या विद्यार्थ्यांने आपल्या बुद्धिमत्ता, जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर एम.ए. आणि पीएच.डी. सारख्या उच्च पदव्या मिळवल्या. पुढे 5 जून 1952 रोजी त्याच विद्यापीठाने त्यांना ‘डॉक्टर ऑफ लॉ’ (LL.D.) ही मानद पदवी देऊन सन्मानित केले. हा केवळ एका व्यक्तीचा नव्हे, तर संपूर्ण भारताचा गौरव होता. कोलंबिया विद्यापीठाने त्यांच्या ‘Waiting for a Visa’ या आत्मकथात्मक लेखनाचा अभ्यासक्रमात समावेश केला आहे. हे विशेष महत्त्वाचे आहे, कारण या विद्यापीठात शिकणारे विद्यार्थी भविष्यातील जागतिक नेते, विचारवंत आणि धोरणकर्ते असतात. अशा विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकरांचे विचार अभ्यासणे म्हणजे त्यांच्या विचारांची जागतिक स्तरावर मान्यता मिळाल्याचे द्योतक आहे. याउलट, भारतात मात्र त्यांच्या विचारांचा अभ्यासक्रमात पुरेसा समावेश झालेला दिसत नाही, ही खंत व्यक्त करावी लागते. प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत त्यांच्या कार्याचा केवळ मर्यादित उल्लेख आढळतो. एवढ्या महान विचारवंताच्या बाबतीत ही परिस्थिती चिंताजनक आहे. डॉ. आंबेडकरांचे विचार केवळ एका देशापुरते मर्यादित नाहीत. ते मानवतावादी, वैज्ञानिक आणि समतावादी तत्त्वज्ञानावर आधारित आहेत. ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ हा त्यांचा संदेश आजही जगभरातील वंचित, शोषित आणि अन्यायग्रस्त समाजासाठी मार्गदर्शक ठरत आहे. हंगेरीसारख्या देशात त्यांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो, जिथे लोक शिक्षणाच्या माध्यमातून आपले हक्क मिळवण्यासाठी संघटित होत आहेत. आज कॅनडातील यॉर्क विद्यापीठ तसेच ऑस्ट्रेलियातील मेलबर्न विद्यापीठात त्यांच्या पुतळ्यांच्या माध्यमातून त्यांच्या विचारांची प्रेरणा दिली जात आहे. हे त्यांच्या जागतिक प्रभावाचे ठळक उदाहरण आहे. डॉ. आंबेडकर हे केवळ एक व्यक्तिमत्त्व नसून एक विचारधारा आहेत, जी काळाच्या ओघात अधिक बळकट होत चालली आहे. आजच्या तरुण पिढीसाठी डॉ. आंबेडकरांचे जीवन हे संघर्षातून यश मिळवण्याचे सर्वोत्तम उदाहरण आहे. अत्यंत कठीण परिस्थितीतही त्यांनी शिक्षण सोडले नाही आणि आपल्या कर्तृत्वाने जगाला दिशा दिली. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांने त्यांना आदर्श मानणे आवश्यक आहे. शेवटी असे म्हणता येईल की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारताचे नाहीत, तर संपूर्ण जगाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या विचारांची गरज आजच्या जागतिक परिस्थितीत अधिक तीव्रतेने जाणवते. समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित समाज घडवण्यासाठी त्यांच्या विचारांचा स्वीकार करणे हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल. ■ ■



ज्योत्स्ना बनसोड
8766942982

# तामिळनाडूत ‘विजय’ ठरवणार विजय!

**आंध्रप्रदेश आणि तामिळनाडूत चित्रपटसृष्टीतील व्यक्तींचा राजकारणावर मोठा प्रभाव दिसून येतो. दक्षिणेकडील राज्यांनी फिल्म इंडस्ट्रीतील कलाकारांना केवळ लोकप्रियतेपुरते मर्यादित न ठेवता अनेकदा सत्तेपर्यंत पोहोचवले आहे.**

तामिळनाडूत 23 एप्रिल 2026 रोजी 234 जागांसाठी सतराव्या विधानसभा निवडणुकीचे मतदान होत आहे. द्रविड चळवळीच्या वारशावर उभे असलेले हे राज्य सामाजिक न्याय, भाषिक अभिमान आणि गैर-ब्राम्हणवादी राजकारणासाठी ओळखले जाते.

स्वातंत्र्यानंतर 1952 ते 1967 या कालावधीत काँग्रेसचे वर्चस्व होते. मात्र त्यानंतर द्रविड मुन्नेत्र कझगम (डीएमके) आणि ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कझगम (एआयएडीएमके) या प्रादेशिक पक्षांनी सत्तेवर आलटून-पालटून कब्जा केला. आजही राष्ट्रीय पक्षांना येथे स्वतंत्रपणे सत्ता मिळवणे कठीण आहे. मात्र प्रादेशिक पक्षांना सत्तेसाठी राष्ट्रीय पक्षांची साथ घ्यावी लागते. 4 मे 2026 रोजी मतमोजणी होणार असून पुन्हा डीएमके सत्तेत येते की एआयएडीएमके बाजी मारते, हे स्पष्ट होईल. अभिनेता विजय यांच्या तमिळगा वेट्री कझगम (टीव्हीके) पक्षाची कामगिरी निकालावर मोठा प्रभाव टाकू शकते.

2021 मध्ये काँग्रेसने 25 जागा लढवून 18 जिंकल्या होत्या. ती डीएमके आघाडीचा भाग होती. भाजपने 20 जागांपैकी 4 जिंकल्या होत्या. यंदा काँग्रेस 28 आणि भाजप 27 जागांवर लढत आहेत. डीएमके 164 तर एआयएडीएमके सुमारे 175 जागांवर निवडणूक लढवत आहे. विजय यांचा टीव्हीके पक्ष सर्व 234 जागांवर स्वतंत्रपणे मैदानात उतरला आहे. त्यामुळे निवडणूक अत्यंत रंगतदार बनली आहे. सर्वेक्षणे डीएमकेच्या बाजूने असली तरी भाजप आणि एआयएडीएमके आक्रमक प्रचार करत आहेत.

तामिळनाडूच्या राजकारणाचा इतिहास पाहिला तर 1967 मध्ये डीएमकेने काँग्रेसचा पराभव करून पहिल्यांदा सत्ता मिळवली. त्यानंतर एम. करुणानिधी आणि एम. जी. रामचंद्रन (एमजीआर) यांच्यासारख्या दिग्गज नेत्यांनी राज्याचे राजकारण घडवले. एमजीआर यांनी पुढे एआयएडीएमकेची स्थापना केली. त्यांच्या निधनानंतर जयललिता यांनी पक्षाचे नेतृत्व करत सहा वेळा मुख्यमंत्रीपद भूषवले. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी ‘अम्मा’ म्हणून मोठी लोकप्रियता मिळवली. 2021 मध्ये एम. के. स्टॅलिन मुख्यमंत्री झाले आणि सध्या ते दुसऱ्या कार्यकाळासाठी मजबूत दावेदार मानले जात आहेत. राज्यात जातीय समीकरणेही महत्त्वाची भूमिका बजावतात. वनियार, थेवर, गौंडर, नाडार आणि दलित समुदाय यांचा राजकीय कल निवडणुकीत निर्णायक




ठरतो. द्रविड चळवळीने ब्राम्हण वर्चस्व कमी केले असले तरी स्थानिक पातळीवर जात हा अजूनही महत्त्वाचा घटक आहे. 2026 मध्ये टीव्हीके पक्ष तरुण आणि शहरी मतदारांना आकर्षित करू शकतो, पण पारंपरिक जातीय समीकरणात मोठा बदल होण्याची शक्यता कमी आहे. मतदारांसमोर रोजगार, शिक्षण, आरोग्य, महागाई, कावेरी पाणी प्रश्न आणि इंधन दर हे प्रमुख मुद्दे आहेत. प्रादेशिक पक्ष विविध आश्वासने देत मतदारांना आकर्षित करत आहेत. डीएमके सरकारने महिलांसाठी आर्थिक सहाय्य, मोफत बस प्रवास, विद्यार्थ्यांसाठी योजना, आरोग्य विमा आणि इतर कल्याणकारी योजना राबवल्या आहेत. त्यांच्या जाहीरनाम्यात महिलांना दरमहा 2 हजार रुपये, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, मोफत लॅपटॉप, 50 लाख नोकऱ्या यांसारखी आश्वासने आहेत.

एआयएडीएमके-भाजप आघाडीनेही महिलांसाठी आर्थिक मदत, मोफत एलपीजी सिलिंडर, शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी आणि पायाभूत सुविधांवर भर देणारी आश्वासने दिली आहेत. विजय यांच्या टीव्हीके पक्षाने बेरोजगारांसाठी भत्ता, शिक्षणासाठी कर्ज, महिला सक्षमीकरण आणि रोजगार निर्मितीवर लक्ष केंद्रित केले आहे. तामिळनाडूच्या राजकारणात चित्रपटसृष्टीचा प्रभाव ऐतिहासिक आहे. अनेक अभिनेते, लेखक आणि दिग्दर्शकांनी राजकारणात प्रवेश करून जनतेशी थेट संवाद साधला. 1952 मधील ‘पराशक्ती’ चित्रपटाने सामाजिक प्रश्न मांडत द्रविड विचारसरणीला चालना दिली. एमजीआर, जयललिता यांसारख्या कलाकारांनी सत्तेपर्यंतचा प्रवास केला. त्यानंतर कमल हासन, रजनीकांत यांसारख्या कलाकारांनीही राजकारणात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. आता विजय यांची एंट्री ही द्रविड पक्षांसाठी मोठे आव्हान ठरू शकते. भ्रष्टाचाराचे आरोपही या राज्याच्या राजकारणाचा भाग राहिले आहेत. जयललिता आणि करुणानिधी यांच्यावर विविध प्रकरणांत कारवाई झाली होती. या घटनांनी राज्यातील राजकीय स्पर्धा किती तीव्र आहे हे दाखवून दिले. द्रविड चळवळीची सुरुवात पेरियार ई. व्ही. रामासामी यांनी केली. सामाजिक न्याय, स्त्री-पुरुष समानता आणि जातिविरोध हा या चळवळीचा पाया होता. आजही या विचारांचा प्रभाव तामिळनाडूच्या राजकारणात दिसतो.

अभिनेता विजय यांनी ‘तमिळगा वेट्री कझगम’ पक्ष स्थापन करून पारंपरिक राजकारणाला पर्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. भ्रष्टाचारविरोध, पारदर्शकता आणि युवा सक्षमीकरण यावर त्यांचा भर आहे. त्यांना तरुणांचा मोठा पाठिंबा मिळत असल्याचे दिसते. मात्र राजकीय विश्लेषकांच्या मते त्यांचा पक्ष सुमारे 15 टक्के मते मिळवत तिसऱ्या क्रमांकावर येऊ शकतो. एकंदरीत, तामिळनाडूची ही निवडणूक केवळ सत्तांतराची नसून पारंपरिक द्रविड राजकारणाला नवे आव्हान देणारी ठरत आहे. विजय यांचा प्रभाव, प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व आणि मतदारांच्या अपेक्षा यांचा संगम या निवडणुकीत पाहायला मिळणार आहे. त्यामुळे ‘विजय’ खरोखरच विजय ठरवणार का, यांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ■ ■

विकास झाडे

## स्त्रीच्या स्वातंत्र्याचा संविधानकर्ता

# डॉ. आंबेडकर कायद्यांपासून सामाजिक विचारांपर्यंत स्त्रीच्या हक्कांना दिलेली दूरदृष्टीपूर्ण दिशा

**आज ऑफिसमध्ये दुपारच्या जेवणाच्या वेळी एक साधा संवाद घडला. एका सहकाऱ्याने विचारले, ‘या वेळेस 14 एप्रिलची सुट्टी नाही का?’**

त्यावर एका महिला सहकाऱ्याने सहज प्रश्न केला, ‘14 एप्रिलला असे काय आहे?’ कुणीतरी उत्तर दिले, ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती.’ हा संवाद क्षणिक असला, तरी अस्वस्थ करणारा होता. कारण हा प्रश्न केवळ माहितीचा नव्हता: तो आपल्या सामाजिक स्मृतीचा आणि जाणीवेचा होता. मला वैयक्तिक पातळीवर वाईट वाटले, पण त्याचवेळी स्वतःबद्दल एक जबाबदारीची जाणीवही झाली. आंबेडकरी विचारांच्या कुटुंबात वाढल्यामुळे, नागपूरसारख्या समतावादी चळवळीच्या भूमीत राहिल्यामुळे आणि वाचनाची आवड असल्यामुळे मला डॉ. बाबासाहेबांना समजून घेता आले हे माझे विशेषाधिकार आहे, हेही उमगले.

‘मी एखाद्या समाजाची प्रगती त्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीच्या प्रमाणावर मोजतो.’ डॉ. बाबासाहेब आंबेडकर.




**स्त्रीच्या शरीरावर हक्क आणि मातृत्वाचा सन्मान :-** जेंडर स्टडीजची विद्यार्थिनी म्हणून डॉ. बाबासाहेबांच्या विचारांकडे पाहिले, तर एक वेगळीच दृष्टी समोर येते. 1928 साली बॉम्बे विधान परिषदेत त्यांनी महिला कामगारांना पगारी प्रसूती रजा मिळावी, यासाठी जोरदार पाठिंबा दिला. त्यांच्या मते, महिलांच्या श्रमावर नफा कमावणाऱ्या व्यवस्थेने त्यांच्या मातृत्वाच्या काळात त्यांना आर्थिक सुरक्षितता देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर, स्त्रियांना त्यांच्या स्वतःच्या शरीरावर हक्क असावा आणि प्रजननासंबंधी निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असावे हे त्यांनी ठामपणे मांडले.

**कायद्यांमधून मिळालेली समानता :-** कायद्याच्या पातळीवरही डॉ. बाबासाहेबांनी स्त्रियांसाठी मूलभूत बदल घडवून आणले. समान वेतन, हुंडाबंदी आणि स्त्रियांच्या सन्मानाचे रक्षण करणारे कायदे त्यांच्या विचारसरणीतून आकारास आले. त्यांनी ‘मूकनायक’ आणि ‘बहिष्कृत भारत’सारख्या वर्तमानपत्रांमधून स्त्रियांच्या प्रश्नांना आवाज दिला. हिंदू कोड बिलाद्वारे त्यांनी स्त्रियांना कायदेशीर समानतेची मजबूत पायाभरणी करून दिली. याच संदर्भात पुढे ‘अनैतिक व्यापार (प्रतिबंध) कायदा, 1956’, ‘हुंडा प्रतिबंध कायदा, 1961’, आणि ‘समान वेतन कायदा, 1976’ यांसारखे महत्त्वाचे कायदे अस्तित्वात आले, ज्यांनी स्त्रियांच्या हक्कांना अधिक बळ दिले.

**मालमत्ता, विवाह आणि वैयक्तिक स्वातंत्र्य :-** मालमत्तेच्या हक्कांबाबत डॉ. बाबासाहेबांनी केलेले बदल अत्यंत मूलगामी होते. पूर्वी स्त्रियांना त्यांच्या आयुष्यात मालमत्ता विकण्याचा किंवा त्यावर पूर्ण हक्क नव्हता; त्यांच्या मृत्यूनंतर ती मालमत्ता पतीच्या कुटुंबाकडे जात असे. डॉ. बाबासाहेबांनी या अन्यायकारक व्यवस्थेत बदल करत स्त्रियांना ‘ॲब्सोल्यूट’ मालकी हक्क दिला.

मुलींना वारसाहक्कात हिस्सा मिळावा, तसेच स्त्रीच्या मालमत्तेवर तिचाच पूर्ण अधिकार असावा ही संकल्पना त्यांनी कायदेशीर स्वरूपात मांडली. यासोबतच विवाह, दत्तक आणि घटस्फोटाचा अधिकार देऊन स्त्रियांच्या वैयक्तिक निवडी, स्वातंत्र्य आणि सन्मानाला कायदेशीर मान्यता दिली.

**कामगार स्त्रियांसाठी हक्कांची पायाभरणी :-** कामगार स्त्रियांसाठीही त्यांनी अनेक कायदे आणि सुविधा निर्माण केल्या. किमान वेतन कायदा, स्त्री व बालकामगार संरक्षणाशी संबंधित कायदे, तसेच कोळसा खाणीमध्ये महिलांच्या कामावर बंदी पुनर्स्थापित करणारे निर्णय या माध्यमातून त्यांनी कामगार स्त्रियांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले. 1942 ते 1946 दरम्यान त्यांनी महिला कामगार कल्याण निधी ही संकल्पना मांडत, समान वेतन, रजा, दुखापतीसाठी नुकसानभरपाई आणि निवृत्तीवेतन यांसारख्या हक्कांना बळ दिले.

**स्त्रीसमतेच्या लढ्याची दिशा :-** कदाचित पुढच्या वेळी एखादी स्त्री ‘14 एप्रिलला काय आहे?’ असा प्रश्न विचारेल, तेव्हा उत्तर केवळ एका जयंतीपुरते मर्यादित राहणार नाही. त्या प्रश्नामागे स्त्रीच्या हक्कांची, तिच्या स्वातंत्र्याची आणि सन्मानासाठी झालेल्या संघर्षाची जी लांब वाटचाल आहे, तीही आपण ओळखू लागलो तरच डॉ. बाबासाहेबांचा विचार खऱ्या अर्थाने समजला, असे म्हणता येईल. कारण डॉ. बाबासाहेबांना आठवणे म्हणजे केवळ त्यांचे नाव उच्चारणे नाही, तर त्यांनी मांडलेली समतेची दृष्टी आपल्या जगण्यात उतरवणे आहे. ■ ■

प्रणाली लांजेवार

# डॉ. बाबासाहेबांना वाचणे काळाची गरज...!

**१४ एप्रिल शुभ दिवस सर्व भारतीय नागरिकांसाठीच नाही तर विश्वातील सर्वच मनुष्य प्राण्यासाठी सोन्याचा दिवस आहे. कारण याच दिवशी माता भिमाई व पिता रामजी यांच्या पोटी कोहिनूर हिऱ्यापेक्षा श्रेष्ठ असलेला व संपूर्ण मानव जातीचा उद्धार करण्यासाठी या महा विभूतीने जन्म घेतले ती महाविभूती म्हणजेच ज्ञानाचा अथांग सागर, कायदेपंडित, महान विचारवंत, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्वरत्न, भारतरत्न, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत.**

या महाविभूतीला मी सर्वप्रथम कोटी, कोटी विनम्र अभिवादन करते. तसेच त्यांच्या महान कार्यापुढे मी नतमस्तक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगाचे उद्धारकर्ते होते. पण, सर्वात जास्त ते मानवी जीवनाचे उद्धारकर्ते होते म्हणून त्यांना महामानव सुद्धा म्हटल्या जाते. अशी महा विभूती या भारत भूमीत जन्म घेऊन या भूमातेचा गौरव वाढवून दिला व सर्वांना सन्मानाने जगायला शिकवले, सर्वांना हक्क, न्याय, अधिकार देऊन स्वतः मात्र एकही दिवस स्वतःसाठी जगले नाही. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या जीवनात किती कष्ट सोसले, किती संघर्ष केले, उपाशीपोटी निजले आणि असे बरेच काही आपण त्या महामानवाच्या जीवनाविषयी कल्पनासुद्धा करू शकत नाही असे जगणे प्रत्येकांच्या भाग्यात येत नसतात ते सर्व दिवस डॉ. बाबासाहेबांच्या वाट्याला आले होते. तरीही त्यांनी आपले पाऊल मागे न घेता प्रत्येक परिस्थितीचा सामान करत जगून दाखवले व जगाला आपल्या अनुभवातून, कार्यातून शिकवण देत राहिले अशी महाविभूती कदाचित दुसरी होणार ही नाही. जन्माला घालणाऱ्या आईबाबांना तर सर्वजण मानत असतात. कारण त्यांनी जन्म देऊन लहान्याचे मोठे केले असतात. सुंदर असे जग दाखवतात पण, तरीही डॉ. बाबासाहेबांना सर्वजण हक्काने बाप मानतात, त्यांना वंदन करत असतात. कारण, त्या बापाने फक्त द्यायलाच शिकले? होते घ्यायला ते कधीच शिकले नाही. म्हणून या महामानवाला आपण आपल्या विचारातून काय देतो किंवा नाही याचे भान किती जणांना आहे ते, त्यांनाच माहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित सर्वजण हक्काने दोन शब्द लिहीत असतात, भाषण देत असतात, गीत गातात. पण, खरेच हक्काने डॉ. बाबासाहेबांचे विचार आत्मसात करून आचरणात आणतात...? हा एक भारी मोठा प्रश्न आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे, पुजल्याने किंवा नाचगाणा केल्याने कळत नाही तर फक्त ते वाचल्याने कळत असतात. 14 एप्रिल या दिवशी डॉ. बाबासाहेबांची जयंती संपूर्ण भारत देशभर मोठ्या श्रद्धेने, निष्ठेने साजरी केली जाते. डॉ. बाबासाहेबांच्या नावाचा जयजयकार केला जातो. अभिमान वाटतो त्या क्षणी आणि जयजयकार करायला पाहिजे. पण, खरेच त्या दिवशी कोणी एखाद्या तरी संकल्प करतात का...? डीजेच्या तालावर व्यसन करून मद्यधुंद होऊन नाचणे हे योग्य नाही. कुठेतरी ते स्वतःच्या मनाला पटते का ते स्वतःचे आत्मपरीक्षण करून बघावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वांना स्वाभिमानाने जगायला शिकवले होते, उच्च शिक्षण घेण्यासाठी मार्गदर्शन केले, अनेक वाटा मोकळ्या करून दिल्या, प्रेरणा दिली आणि आपण खरेच त्यांना काय देतो? कोणी जातात अंधश्रद्धेच्या दारात तर कोणी कोणाला दुखावून बोलतात, कोणी भांडणे करतात तर कोणी फक्त त्यांच्या जयंती व महापरिनिर्वाण दिनानिमित्त वंदन करून विसरून जातात. काहींचे जगणे तर जगावेगळे असते.




जर डॉ. बाबासाहेब त्या भयानक काळात असेच विसरून जगले असते तर आजच्या प्रत्येक मनुष्य प्राण्याच्या जीवनाचा उद्धार झाला असता का...? पण, त्या महामानवाने मात्र सदैव इतरांच्या विषयी, देशाच्या हितासाठी, विकासासाठी रक्ताचे पाणी, हाडाचे मणी करून जगाला जगवत राहिले एवढेच नाही तर आपण सुखाने संसार सुद्धा केले नाही. एवढा त्याग, त्या माई रमाईचा होता. डॉ. बाबासाहेबांच्या पाठीशी राहून ती माऊली गोवऱ्या थापत होती तरीही तिच्या डोळ्यात अश्रू वाहत नव्हते. एवढे दुःख व संकटे त्या माऊलीने सोसले हे कोणासाठी? म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना माई रमाईचा सदैव आदर वाटत असे. अशी ती माऊली कित्येक लेकरांची माय झाली. तिचा त्याग व संघर्ष क्षणभरासाठी सुद्धा विसरता कामा नये. पण, शोकांतिका आहे की, आज त्या माऊलीचा आदर्श घेऊन जगायचे सोडून आजच्या महिला मात्र कोणत्या जगात जगतात त्यांचे त्यांना माहीत. त्यांना फक्त सुख, ऐशोआराम हवे असते एवढे बघण्याआधी त्या माऊलीला वेळात, वेळ काढून आठवण करावे. कारण तिच्या त्या महान त्यागातून सर्वांचे उद्धारकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर घडले. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर दोन शब्द लिहिताना डोळ्यात मात्र अश्रू येतात, आपोआप डोळे भरुन येतात आणि त्यांचे नाव जरी मुखात आले तरी अंगात एक प्रकारची वेगळी उर्जा निर्माण होत असते. कारण, आज त्यांच्यामुळे सर्वांना सुखाचे दिवस आले आहेत, रहायला करोड रूपयाचे बंगले मिळाले आहेत आणि फिरायला महाग गाड्या मिळाल्या आहेत ही सर्व देण त्या महामानवाची आहे. पण, कितीजण महामानवाला वाचतात, किंवा ओळखतात हेच मात्र दिसून येत नाही. म्हणून कुठेतरी आजही समाजात बदललेले चित्र बघायला मिळत असतात. म्हणून आजच्या या शुभदिनी प्रत्येकांनी एकतरी संकल्प करावे व त्यांच्या विचारांना आत्मसात करून आचरणात आणावे हीच खरी भीम जयंती असेल आणि पुन्हा एकदा नव्याने जगण्याचा अर्थ कळेल. कारण डॉ. बाबासाहेबांनी सर्वांना माणूस बनून माणसासारखे प्रामाणिकपणे जगायला शिकवले होते त्या उद्धारकर्त्याला, चवदार तळ्याचे पाणी पाजणाऱ्या महामानवाला जर काही द्यायचेच असेल तर एक चांगला माणूस बनून समाजासाठी व देशाच्या हितासाठी काही करता येईल का यासाठी प्रयत्न करावे. जर असेच जगणे प्रत्येक मनुष्यप्राण्याचे असेल तर नक्कीच डॉ. बाबासाहेबांना आनंद होईल. कारण, डॉ. बाबासाहेब जरी शरिराने जगात नसले तरी आपल्या महान कार्यामुळे आजही जिवंत आहेत आणि कायम राहतील. असा महामानव पुन्हा दुसरा होणार नाही. या ज्ञानाच्या अथांग सागराला सदैव आठवावे व त्यांना वाचावे आणि आजच्या घडिला त्यांना वाचणे अत्यंत काळाची गरज आहे. जे कोणी त्यांचे महान कार्य बघून डॉ. बाबासाहेबांना वाचतात त्यांनाच डॉ. बाबासाहेब कळत असतात. ■ ■



संगीता संतोष ठलाल
7821816485



स्वाभिमानाचे स्मरणशिल्प १२४

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा पवनी, जि. भंडारा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आमचे मुक्तीदाते असून तेच आमचे मार्गदर्शक आहेत. पुतळ्याजवळ धर्मप्रभा विहार आहे. विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. दिनविशेष कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात गाव परिसरातील नागरिक उपस्थित असतात.

संवाद मित्र, मुकुंद मेश्राम.
मो. 9923522083



## 'कवितामय बावीस प्रतिज्ञा' काव्यसंग्रहाच्या इंग्रजी आवृत्तीचे प्रकाशन

**छत्रपती संभाजीनगर :** आंबेडकरी साहित्यातील प्रख्यात कवयित्री संघमित्रा गेडाम यांच्या 'कवितामय बावीस प्रतिज्ञा' या मूळ मराठी काव्यसंग्रहाचा इंग्रजी अनुवाद 'THE ww VOWS IN POETIC FORM' याचे प्रकाशन नुकतेच त्रिरत्न बुद्ध विहार, हुडको एन. अकरा छत्रपती संभाजी नगर येथे उत्साहात पार पडले. भीमराव सरवदे यांनी या संग्रहाचा इंग्रजी भाषेत अनुवाद केला आहे. या सोहळ्याला भिक्खू संघ यांच्यासह अध्यक्ष बौद्धाचार्य व्ही.के. वाघ, गुणवंतराव गवई, अशोक सूर्यवंशी, सुदाम पालवे, अरुण सुरडकर, एकनाथ बोराडे, दिपक पगारे, पेंटर गायकवाड, वसंत सुरडकर, निर्मला गवई, वनमाला सूर्यवंशी, सुनिता सुरडकर, चंद्रकला पालवे, सुनीता खरात, प्रतिभा बनसोडे आणि मंगला साळवे यांची उपस्थिती होती. या सर्वांच्या हस्ते दि.13 एप्रिल 2026 भीम जयंतीच्या पूर्व संध्येला इंग्रजी आवृत्तीचे लोकार्पण करण्यात आले. पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रसिद्ध आंबेडकरी साहित्यिक देवानंद पवार यांनी केले. आपल्या भाषणात त्यांनी साहित्याच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे अध्यक्ष बौद्धाचार्य व्ही.के. वाघ यांनी बावीस प्रतिज्ञांचे महत्त्व विशद करताना सांगितले की, 'महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञा हा केवळ शब्दांचा समूह नसून, तो मानव मुक्तीचा एक महान विचार आहे.' आभार त्रिरत्न बुद्ध विहार समितीच्या अध्यक्षा निर्मला गवई यांनी उपस्थितांचे आणि मान्यवरांचे आभार मानले. या इंग्रजी अनुवादामुळे डॉ. बाबासाहेबांच्या बावीस प्रतिज्ञांचा विचार आता जागतिक स्तरावर पोहोचण्यास मदत होणार आहे, असा विश्वास या प्रसंगी व्यक्त केला.

## सामाजिक न्यायासाठी सजग राहा : डॉ. संजय पळवेकर



**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अंतर्गत डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग व डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. संजय पळवेकर यांनी 'डॉ. आंबेडकरांच्या दृष्टिकोनातील सामाजिक न्याय व आजचे वास्तव' या विषयावर मार्गदर्शन करत 'अपमान म्हणजे अन्याय' असे स्पष्ट करत सामाजिक न्यायासाठी सजग राहण्याचे आवाहन केले. त्यांनी समता, न्याय, बंधुता यांचे महत्त्व, बौद्ध धर्म स्वीकारण्यामागील पार्श्वभूमी तसेच हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्री-पुरुष समानतेवरील डॉ. आंबेडकरांचे योगदान अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अविनाश फुलझेले होते. त्यांनी भारतीय समाजातील जातीय विषमता व अस्पृश्यतेच्या प्रश्नांवर भाष्य करत पुणे कराराच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या हक्कांवर प्रकाश टाकला. तसेच सामाजिक-आर्थिक समतेचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रम कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी डॉ. गौतम कांबळे, डॉ. रमेश शंभरकर, डॉ. सुभाष नगरारे, प्रा. मंगेश जुनघरे, प्रा. प्रीती वानखडे, डॉ. सुबोध गोरले, डॉ. रमेश राठोड, डॉ. सरोज डांगे, प्रा. चिमुरकर, डॉ. मोहन वानखडे व डॉ. सुनीता सावरकर यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करून जयंती उत्सव साजरा केला.

## बार्टीच्या विद्यार्थ्यांचे एमपीएससीत उज्वल यश

### 25 जण उत्तीर्ण




**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या राज्यसेवा परीक्षा 2024 चा अंतिम निकाल 8 एप्रिल 2026 रोजी जाहीर झाला असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणेच्या प्रशिक्षणातून 25 विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. बार्टीच्या प्रशिक्षण व आर्थिक सहाय्यामुळे अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना प्रशासकीय सेवेत संधी मिळाल्याचे अधोरेखित झाले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये बेलेकर चिराग मुरलीधर (मुख्य अधिकारी/सहाय्यक आयुक्त, गट-अ), परवेकर प्रतीक साहेबराव (पोलीस उपअधीक्षक/सहाय्यक पोलीस आयुक्त, गट-अ), कांबळे वर्षा ज्ञानदेव, कांबळे सायली सुदाम लता, हाटे निलेश नरेश (सहाय्यक संचालक, वित्त व लेखा सेवा, गट-अ), गजभिये सुलभा रमेशराव, वासनिक आकाश मनोहर, घोरपडे शुभम मोहन (सहाय्यक आयुक्त, राज्य कर, गट-अ), घुगे राजेंद्र किसन, राऊत प्रवीण सुरेश, धनंदर मनोज नरेंद्र (गटविकास अधिकारी, गट-अ), भोसले काजल विलास, धवस्कर संदेश मारोती, गवई मोनिका बाबाराव, सांगडे संदिप आनंदराव (सहाय्यक प्रकल्प अधिकारी, गट-ब), सावंत गोतम अंकुश, दळवी संध्या संपत, शिंदे किरण सुनील, शिंदे मनोज विजयकुमार, पवार उपा गंगाधर, घाडगे अभिजीत गौतम, पोवार मयूर उर्फ मंदार संजय, पवार आकाश गौतम (तपासणी अधिकारी, गट-ब), त्रिभुवन अविनाश अशोक, पालके आदिनाथ दिपक (मंत्रालय विभाग अधिकारी, गट-ब) यांचा समावेश आहे. या यशाबद्दल सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री ना. संजयजी शिरसाट, राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ, प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, समाजकल्याण आयुक्त तथा बार्टीच्या महासंचालक दिपा मुधोळ-मुंडे, निबंधक डॉ. सुचिता शिंदे आणि योजना विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## महत्वाचे

### दिलीप तांदळे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय सन्मान



**नागपूर :** समाजसेवक दिलीप महादेव तांदळे यांना 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय सन्मान 2026' प्रदान करण्यात आला. हा सन्मान Global Icons of India E-Magazine तर्फे त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत देण्यात आला. तांदळे हे Tandale Guruji Resource and Development Society चे संस्थापक अध्यक्ष असून 2005 पासून वंचित घटकांसाठी कार्यरत आहेत. शिक्षण, जनजागृती आणि संविधानिक मूल्यांच्या प्रसारासाठी त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते.

### बार्टीत समता सप्ताह साजरा



**पुणे :** संत गाडगेबाबा हे किर्तीशिल संत होते. त्यांनी किर्तनाच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा कर्मकांड, जातिभेद यावर प्रहार केला. तसेच त्यांनी आपल्या किर्तनात स्वच्छतेचे व शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या किर्तनातून ते महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कार्याचा गौरव करत असत. संताच्या विचारांचा प्रसार व प्रचार त्यांनी केला. महापुरुषांचा वारसा आपण पुढे नेला पाहिजे असे प्रतिपादन प्रबोधनकार डॉ. सुनिल धनगर यांनी बार्टी संस्थेत समता सप्ताह कार्यक्रमांत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त दि. 9 एप्रिल 2026 रोजी बार्टी सभागृहात संत गाडगेबाबा यांचे प्रबोधन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.याप्रसंगी निबंधक डॉ. सुचिता शिंदे, विभागप्रमुख शुभांगी पाटिल, डॉ. बबन जोगदंड, लेखाधिकारी नितीन चव्हाण यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.प्रथम संविधान प्रास्ताविकेचे सामुदायिकपणे वाचण करण्यात आले. संचालन रामदास लोखंडे यांनी केले. प्रास्ताविक कार्यालय अधिक्षक प्रज्ञा मोहिते यांनी केले. आभार वैशाली खांडेकर यांनी मानले.

### प्रख्यात कवी विजय वासाडे यांना विश्वबंधुता साहित्य पुरस्कार



**नागपूर :** नुकतेच पुणे येथे विश्वबंधुता साहित्य परिषद व काषाय प्रकाशनाच्या वतीने एकदिवसिय विश्वबंधुता साहित्य संमेलन स्वागताध्यक्ष शरयू पवार, संमेलनाध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे, महाराष्ट्राचे लाडके कवी प्रा. चंद्रकांत वानखेडे, प्रसिद्ध व्याख्याते सुभाष वारे, कविसंमेलनाध्यक्ष गझलकार विनोद सावंत, यांच्या उपस्थितीत अतिशय उत्साहात पार पडले, यात प्रामुख्याने विजय वासाडे, नागपूर यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विश्वबंधुता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विजय वासाडे यांनी अल्पवधीतच साहित्यक्षेत्रात आपली दखलपात्र उपस्थिती नोंदवली असून ते अक्षरक्रांती फाऊंडेशन, चारोळी मंच, साहित्य सेवा कलामंडळ, बांधिलकी प्रतिष्ठान या आघाडीच्या

## धम्मसंगोष्टीत 'फुले-आंबेडकरांची राष्ट्रनिर्मितीतील भूमिका' या विषयावर प्रबोधन



**नागपूर :** धम्मसंगोष्टीच्या 390 व्या सभेत 'क्रांतीबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राष्ट्रनिर्मितीत भूमिका' या विषयावर प्रबोधनपर चर्चा पार पडली. या वेळी वक्ते म्हणून अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी विचार मांडले. डॉ. कडू म्हणाले की, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेली राष्ट्राची संकल्पना स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित आहे. ही मूल्ये ज्या देशात नाहीत, तो देश खऱ्या अर्थाने राष्ट्र ठरू शकत नाही. संविधानाच्या उद्देशिकेत डॉ. बाबासाहेबांची राष्ट्रकल्पना स्पष्टपणे मांडलेली असून, प्रत्येक कलमातून भारत राष्ट्राची उभारणी झाली आहे. कामगार, शेतकरी, कष्टकरी तसेच महिलांच्या सर्वसमावेशकतेतून राष्ट्रनिर्मिती होते, असे त्यांनी स्पष्ट केले. देशात सध्या हिंदू राष्ट्राच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याची टीका करत त्यांनी ही प्रवृत्ती धोकादायक असल्याचे नमूद केले. रॅलीमध्ये संविधानाची प्रत पालखीत ठेवून पूजनाची संकल्पनाही मांडण्यात आली आहे. सभाध्यक्ष धर्मेश प्रसेनजीत यांनी समाजातील अंधश्रद्धा, धार्मिक अतिरेक आणि तरुणांमध्ये वाढत चाललेली भ्रामक प्रवृत्ती यावर भाष्य केले. आंबेडकरी समाजातील आर्थिक परिस्थिती लक्षात घेता अनावश्यक खर्च टाळून शिक्षण आणि जागृतीकडे वळण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमात कल्पना मानकर यांनी ओबीसी समाजातील जनजागृती उपक्रमांची माहिती दिली. प्रारंभी सुनील रंगारी यांनी धम्मगीत सादर केले. अल्पोपहाराची व्यवस्था संध्या बनसोड यांनी पाहिली. कार्यक्रमाचे संचालन माया चव्हाण यांनी केले, तर आभार नरेश धोपटे यांनी मानले.

## भारतीय बौद्ध महासभेचा उपवर्गीकरण जागृती अभियानाला प्रतिसाद



**नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त उपवर्गीकरण (अ, ब, क, ड) विषयावर जागृती अभियान राबविण्यात आले. संविधान चौक येथे स्टॉल उभारून नागरिकांना आक्षेप नोंदविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. स्टॉलचे उद्घाटन केंद्रीय संघटक इंजि. पद्माकर गणवीर यांनी केले. सकाळी 8 वाजता समता सैनिक दल यांच्या वतीने दीक्षाभूमी, लक्ष्मीनगर ते काचिपुरा चौक मार्गे मार्च काढल. घोषणांद्वारे उपवर्गीकरणाविरोधातील आक्षेपांची माहिती दिली. संविधान चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास मानवंदना दिली. याप्रसंगी भन्ते बी. राहुल बोधी, राज्य संघटक भीमराव फुसे, राज्य महिला संघटक सुजाता रामटेके, नागपूर शहर जिल्हा अध्यक्ष विजय मेश्राम, पश्चिम जिल्हा अध्यक्ष सुधाकर मेश्राम, पश्चिम महिला अध्यक्ष इंदु रामटेके, महिला महानगर जिल्हा अध्यक्ष पपीता खोब्रागडे, जे.आर. गोडबोले, रमा धोंगळे, छाया रोडगे, सुधा मेश्राम, रमा गोडबोले, अल्का रामटेके, अल्का लोखंडे, राज रक्षित, शुद्धोधन धाबर्डे, निरंजन वारकर, सिद्धार्थ सातवार, नरेंद्र थुल, विशाल वानखेडे, लक्ष्मीकांत मेश्राम, रविंद्र डोंगरे, सुधा मेश्राम, नितीन जामगडे, गंगाधर कांबळे, डॉ. तकशील वासनिक, आनंद सायरे, आनंदराव खोब्रागडे, अरविंद बोरघाटे, नंदकिशोर खोब्रागडे उपस्थित होते. यानंतर उपवर्गीकरणावरील आक्षेप मेलद्वारे नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले. मंचावर भन्ते बी. राहुल बोधी, विजय मेश्राम, अरुण भारशंख, आनंद पिल्लेवान, सोनाली वंजारी, कुणाल टेम्भूर्णे, विनोद बन्सोड, कल्पना भारशंख यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन विनय ढोके यांनी केले तर आभार टार्जन ढवळे यांनी मानले.

## नवीन शिक्षण धोरणावर टीका

### पाच वर्षांत सुमारे 3000 शाळा बंद झाल्या : रमेश बीजेकर



**नागपूर :** खामला सम्राट बुद्ध विहार, उपाली कॉलनी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्य वक्ते रमेश बीजेकर आणि अध्यक्ष डॉ. अशोक डोंगरे यांच्या हस्ते ध्वजारोहण, दीपप्रज्वलन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. बुद्ध व भीम वंदन गीतांनी कार्यक्रमाची सुरुवात झाली. गायनात माधुरी वंजारी, स्नेहल पाटील, वंदना धाबर्डे, विशाखा हिवरकर, नलू गुढे व कांता सोंडवले यांनी सहभाग घेतला. ए.के. पाटील यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. रमेश बीजेकर यांनी 'बाबासाहेबांचे शैक्षणिक धोरण आणि आजचे शिक्षण धोरण' या विषयावर मार्गदर्शन करतांना शिक्षणाच्या सार्वत्रीकरणावर भर देत त्यांनी मागील पाच वर्षांत सुमारे 3000 शाळा बंद झाल्याचे, लाखो विद्यार्थी शाळाबाह्य असल्याचे व हजारो शिक्षक पदे रिक्त असल्याचे सांगत शिक्षणाच्या हक्कासाठी संघर्षाचे आवाहन केले. डॉ. अशोक डोंगरे यांनी बाबासाहेबांच्या संघर्षमय कार्याची आठवण करून दिली. तसेच ताराचंद चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. डॉ. भगत कुटुंबियांनी विहाराला सिलिंग फॅन दान दिला. कार्यक्रमाचे संचालन स्नेहल पाटील यांनी तर आभार प्रदर्शन कांता सोंडवले यांनी केले. गोपीचंद व भाऊराव रामटेके तसेच सुभाष सुखदेवे सर यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला.

# विविध संस्था संघटनांकडून फुले-आंबेडकर जयंती साजरी !



## दि बुद्धिष्ट सोसायटी ऑफ इंडिया

**नागपूर :** दि बुद्धिष्ट सोसायटी ऑफ इंडिया तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त संविधान चौकातील त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी राष्ट्रीय महासचिव शंकर ढेंगरे, शहर अध्यक्ष मिलिंद डांगे, उपाध्यक्ष हरिदास बेलेकर, मृणालिनी दहिवाडे, चंद्रशेखर सोनागोते, रुपदास गेडाम, निरंजन गजभिये, दिगंबर बनकर, कल्पना बनकर, रेखा नितनवरे, तृप्ती ढोके, ज्ञानदेव गजभिये, शिल्पा पांडे, गोपीचंद अंभोरे, जासूंद पाटील, सिद्धार्थ गजभिये, इंदिरा सोनागोते, अल्का चौकीकर, भिमराव मेश्राम आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## बुद्धभूमी, नालासोपारा

**नालासोपारा :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक व शैक्षणिक संस्था (रजि.) नालासोपारा पश्चिम, यांच्या वतीने प्रियदर्शी राजा सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती महोत्सव 12 ते 14 एप्रिल दरम्यान आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात समता, मैत्री व एकात्मतेचे उत्तम दर्शन पहायला मिळाले. 12 एप्रिलला भव्य मिरवणूक, 13 ला शैक्षणिक व क्रीडा स्पर्धा, तर 14 एप्रिलला धम्मदेशनासह विविध कार्यक्रम पार पडले. संध्याकाळच्या सांस्कृतिक कार्यक्रमात स्थानिक महिलांनी नृत्य, गीत व एकपात्री प्रयोग सादर केले. सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. 14 तारखेला सकाळच्या सत्रात भदंत डॉ. मैत्रेयघोष आयुपाल महास्थविर यांची संशोधनात्मक व अभ्यासपूर्ण धम्मदेसना झाली. संध्याकाळच्या सत्रात महिलांचा गंधफुल कार्यक्रम व त्यानंतर झालेल्या सभेमध्ये प्रा. संध्याताई वैद्य यांनी महापुरुषांच्या जीवनातील अनेक मौल्यवान पैलूंवर प्रकाश टाकला. 'माता रमाई' विषयावर आयुनी दर्शना पवार यांच्या



एकपात्री प्रयोगाने प्रेक्षकांना भावूक केले. महोत्सवात मोठ्या संख्येने अनुयायी सहभागी झाले होते. या सर्व महिलांचा कार्यक्रम तयार करून घेण्यात व त्यांच्या कलागुणांना योग्य पद्धतीने सादर करण्यात अमोल गायकवाड यांना कला दिग्दर्शक म्हणून फार मोठे श्रेय जाते, सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, सभासद, संस्थेशी संलग्न असलेल्या बौ.पं.स.शाखा व महिला मंडळ तसेच सर्व तरुण वर्ग आणि सर्व मित्र संघटना यांनी अथक परिश्रम घेतले.

## नागार्जुना अभियांत्रिकी महाविद्यालय




**नागपूर :** नागार्जुना इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट येथे महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. 'थोर महामानवांचे विचार हीच समाज परिवर्तनाची गुरुकिल्ली' असे प्रतिपादन प्रमुख अतिथी डॉ. बी.एम. कौसल यांनी केले. प्राचार्य रसिक उपाध्ये यांनी शिक्षण, समता व सामाजिक जाणीवेचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना प्रेरित केले. अतिथी डॉ. प्रकाश राठोड यांनी फुले-आंबेडकरांच्या सामाजिक व संविधानिक कार्याचा गौरव करत समताधिष्ठित समाज घडविण्याचे आवाहन केले. प्रा. अमित मेश्राम यांनी भीमगीत सादर केले, तर सलोनी प्रसाद, पूर्वा मेश्राम व वंश गजभिये यांनी नृत्य व गाण्याद्वारे कार्यक्रम रंगविला. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. हर्षा मेश्राम व प्रा. श्रुती पाटील होते. मैत्रेय शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष अजय वाघमारे, सचिव प्रदीप नगरारे व कोषाध्यक्ष कुलदीप रामटेके यांनी आयोजकांचे कौतुक केले. संचालन सुहानी बगाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. श्रुती पाटील यांनी केले. कार्यक्रम समता, शिक्षण व सामाजिक जाणीवेचा संदेश देत उत्साहात पार पडला.

## 'प्रबुद्ध रंगभूमी, नागपूर'



**नागपूर :** छत्रपती शिवाजी महाराज तसेच सम्राट अशोक हे समतावादी राजे होऊन गेले. सम्राट अशोकांमूळेच बुद्ध जगाला माहीत झाला, असे विवेचन डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने आणि 'प्रबुद्ध रंगभूमी, नागपूर' (अखिल भारतीय प्रबुद्ध नाट्य परिषदेच्या अंतर्गत) यांनी आयोजित केलेल्या 'प्रबुद्ध सांस्कृतिक सप्ताह'चा एक भाग म्हणून, दि. 9 एप्रिल 2026 छत्रपती शिवाजी महाराज तसेच सम्राट अशोक यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी ॲड. रमेश शंभरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा, यांनी अत्यंत मार्मिक विचार व्यक्त केले. या प्रसंगी प्रबुद्ध विद्यालय वकील पेठ येथील वर्ग 9 च्या विद्यार्थीनीने रमाई हे एकपात्री नाटक सादर केले. प्रमुख पाहूणे म्हणून सुप्रसिद्ध कवी लोकनाथ यशवंत उपस्थित होते. त्यांनी जेलर ही कविता सादर केली. आरोग्यावर देवानंद देशमुख यांनी सविस्तर महिती दिली. या प्रसंगी कवी संजय गोडघाटे, आनंद पिल्लेवान, राजन मेश्राम, राजन गोंडाने, रंगराजन गोस्वामी, रत्नपाल गोटेकर, सुनील शेंडे, विनोद लोणारे, प्रविण घोडके, जनार्दन देशपांडे, रवींद्र गणवीर आणि पम्मी सायरे, समिक्षा देशमुख आणि निंबूनाबाई मुलींच्या वसतिगृहातील विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



## गौतमी बहुउद्देशिय महिला मंडळ

**नागपूर :** गौतमी बहुउद्देशिय महिला मंडळ पंचशील झेंडा समिती आय यु डी पी काटोल यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे साजरी करण्यात आली. महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर विविध कार्यक्रम राबविण्यात आले. ड्राईंग स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, डान्स स्पर्धा महिलांसाठी भीम गीत, व भीमगीत डान्स स्पर्धा या कार्यक्रमाला माजी गृहमंत्री अनिलबाबु देशमुख व काटोलच्या नगराध्यक्षा अर्चना देशमुख, प्रज्ञा डोंगरे नगरसेविका गणेश चन्ने सभापती बांधकाम विभाग महेंद्र गायकवाड नगरसेवक माजी सभापदी दिगांबर डोंगरे सामाजिक कार्यकर्ते उत्तमराव दुपारे, सचिन बांगर, यशवंतराव शेंडे, साहित्य लेखक रवी दलाल तसेच बरेच मान्यवर उपस्थित होते. पंचशिल झेंड्याचे ध्वजारोहण अर्चना देशमुख यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्ये जिवनचरित्र व महिलांचे संविधानिक अधिकार समजावून सांगितले. कार्यक्रमाचे संचालन मंडळाच्या सचीव निर्मला रक्षे यांनी केले व ललिता दुपारे यांनी जयभिम शब्द म्हणजे काय यावर प्रकाश टाकला. आभार प्रदर्शन वैशाली दलाल यांनी केले. सुशिला पंचभाई, अर्चना झिलपे, प्रज्ञा बांगर, सुजाता वाहने, माला बागडे, शोभा सोनवणे, रंजना शेंडे, ज्योती भालेराव, साधना रक्षित, वसुंधरा गजभिये, ममता नाईक, वर्षा टेभुर्णे, रेश्मा काळबांडे पुष्पा बन्सोड, चारुशिला गजभिये, सुनीता मेश्राम, शिला बन्सोड, प्रिती बांगर, निलीमा तिरपुडे, नम्रता सहारे, ज्योती टेंभुर्णे, रोशना बन्सोड, वैशाली नारनवरे, वंदना सहारे, पद्मा गायकवाड, घरडे व आ यु डी पी परिसरातील मोठ्या संख्येने महिलांची व पुरुष मंडळीची उपस्थिती होती.

## इंदिरा गांधी महाविद्यालय



**कळमेश्वर :** इंदिरा गांधी कला/वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर येथे महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे होते, तर प्रमुख उपस्थिती समता दूत कुंदा बोरकर यांची होती. प्रारंभी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन केले व संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. जयंतीनिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धेत तनुश्री चौधरी हिने प्रथम, सलोनी बागडे हिने द्वितीय, तर करिश्मा पारसे हिने प्रोत्साहन पारितोषिक मिळविले. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन मंजुषा कापसे यांनी केले, तर आभार प्रा. किशोर दुर्गे यांनी मानले. यावेळी प्रा. जावेद मालीक परवेज, प्रा. मंजुषा दोबळे, संजय रामटेके, चेतन ठवरे यांच्यासह विद्यार्थी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## फुलमती ले-आऊट, ऐश्वर्या नगर, एकता नगर

**नागपूर :** फुलमती ले-आऊट, ऐश्वर्या नगर, एकता नगर, गल्ली नं. 2, शताब्दी नगर परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त 16 एप्रिल 2026 रोजी संघमित्रा फाऊंडेशन व रमाई महिला मंडळ यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. 'मी रमाई बोलतेय' या रमाईंच्या जीवनावरील लघुनाटिकेचे सादरीकरण शोभा गौतम पाटील यांनी केले, तर गौतम पाटील यांनी डॉ. आंबेडकरांची भूमिका साकारली. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे यांनी बुवाबाबांच्या अंधश्रद्धेविरोधात प्रात्यक्षिक सादर केले. डॉ. प्रा. सुनील भगत यांनी संविधान विषयावर, तर डॉ. अरविंद पुनवटकर यांनी विवेकी जीवनशैलीवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते देवयानी भगत, अशोक राऊत, उमेश चित्ते, वंदना मेंढे, मंगला गाणार, इंदू उमरे, अंजली भजने उपस्थित होते. उत्सव यशस्वी करण्यासाठी राजेंद्र कावरे, चंद्रगुप्त नरांजे, प्रज्ञावंत कांबळे, राहुल चक्रे, विजय पाटील, तसेच संघमित्रा फाऊंडेशनचे प्रशांत मुंद्रे, सारिका मुंद्रे, गुलशन राऊत, संगीता गायकवाड, रजनी कावरे, स्मिता धोंगडे, मृणाली तिरपुडे, आदर्श पाटील, देवर्ष गायकवाड, राजू धोंगडे, जया थूल, शीतल मानकर, डॉ. शितल चव्हाण, अश्विनी फुलझले, अस्मिता लामसंगे, वंदना मेश्राम, मंगला लोखंडे, गुरुदत्त मेश्राम, शैलेश गायकवाड, माया कांबळे, सुरेखा नितनवरे, पद्माकर नितनवरे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648